अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयुरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा | व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०८.०७.२०२५ | अंक नं. ८५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल..
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रंगीबेरंगी वस्त्रांचं अवघं विश्व..
आशिर्वाद
- लक्ष्मीपती डिझाईनर साडी स्टुडिओ -
गुरु गणेश कॉम्प्लेक्स, माळीवाडा, अहिल्यानगर
फोन : 0241-2425111 / 9260278511
मेनरोड, जामखेड मोबा. : 9420656104 / 9421809421
महा सेल 10% TO 50% DISCOUNT
MAHA SALE १०% ते ५०% पर्यंत सुट
मनसोक्त खरेदीचं परफेक्ट डेस्टीनेशन
10% ते 50% पर्यंत डिस्काऊंट
ब्रॅन्डेड सारीज । डिझाईनर सारीज । टॉप्स कुर्तीज । ड्रेस मटेरियल
Conditions Apply*

# भाजपाचे आ. सुरेश धस यांच्या एम जी ग्लॉस्टर कारला नगर-पुणे महामार्गावर अपघात; तरुणाचा जागीच मृत्यू

## सागर सुरेश धस याच्यावर गुन्हा दाखल

नगर - आष्टी (जि. बीड) येथील भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस यांच्या कारने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत हॉटेल व्यावसायिक तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना ७ जुलै रोजी रात्री १०.३० च्या सुमारास नगर-पुणे महामार्गावर जातेगाव फाटा (ता.पारनेर) येथे घडली. आ.धस यांचा मुलगा सागर सुरेश धस हा कार चालवत होता. त्यामुळे त्याच्याविरुद्ध सुपा पोलिस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघातात नितीन प्रकाश शेळके (वय ३४, रा. पळवे खुर्द, ता.पारनेर) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. मयत नितीन शेळके यांचे जातेगाव फाटा येथे सह्याद्री हॉटेल आहे. रात्री १०.३० च्या सुमारास ते हॉटेलवरून पळवे येथे घरी जाण्यासाठी मोटारसायकलवर निघाले. महामार्गावर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला ते यु टर्न मारत असताना नगरकडून पुण्याकडे भरधाव वेगात जात असलेल्या एम.जी. कंपनीच्या ग्लॉस्टर कारने (क्र. एमएच २३, बीजी २९२९) त्यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. त्यामुळे ते रस्त्यावर उडून पडले व गंभीर जखमी झाले. त्यांना परिसरातील नागरिकांनी उपचारासाठी सुपा येथील रुग्णालयात हलविले, मात्र डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले.


अपघातग्रस्त कार.


नितीन शेळके (मयत)

दरम्यान या अपघाताची माहिती मिळताच सुपा पोलिस ठाण्याचे स.पो. नि. सोमनाथ दिवटे हे पोलिस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अपघाताला कारणीभूत ठरलेली कार व त्यात असलेले सागर सुरेश धस व त्याच्या एका मित्राला त्याब्यात घेतले. दोघांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तर मयत नितीन शेळके यांचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला. ८ जुलै रोजी सकाळी शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मयत शेळके यांच्यावर पळवे येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

मयत नितीन शेळके यांच्या पश्चात पत्नी, २ लहान मुले, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. नितीन शेळके यांचा ज्या ठिकाणी अपघात झाला तेथेच २ वर्षापूर्वी त्यांचे वडील प्रकाश शेळके यांचाही अपघाती मृत्यू झाला होता, तर त्यांच्या चुलत्यांचाही त्याच ठिकाणी अपघाती मृत्यू झालेला असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले. या प्रकरणी दुपारी उशिरा सुपा पोलिस ठाण्यात सागर सुरेश धस (रा.आष्टी, जि.बीड) याच्याविरुद्ध अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वप्निल पोपट शेळके यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

# खुल्या जागा, खोल्या, गाळ्यांच्या भाडे वसुलीसाठी विशेष मोहीम; अहिल्यानगर महापालिकेच्या मार्केट विभागाची १० पथके नियुक्त

**संपूर्ण थकबाकी भरुन करारनाम्यांचे नुतनीकरण न केल्यास जप्तीची कारवाई करणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**

नगर - महानगरपालिकेच्या मालकीच्या व सध्या भाडेतत्वावर देण्यात आलेल्या खुल्या जागा, व्यापारी संकुलातील गाळे, ओटे, शाळा खोल्या, मंगल कार्यालयांच्या सद्यस्थितीचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. १०१६ मालमत्तांपैकी ६८२ गाळे, जागांचे करारनाम्यांची मुदत संपुष्टात आली आहे. तसेच, बहुतांश भाडेकरूंकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. ही रक्कम सुमारे २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. या थकबाकी वसुलीसाठी उपायुक्त, सहाय्यक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली मार्केट विभागाची दहा पथके नियुक्त करण्यात आली आहेत. वसुली, नुतनीकरण, कारवाईसाठी विशेष मोहीम महानगरपालिकेमार्फत राबवण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.


महानगरपालिकेत आढावा बैठकीत बोलताना आयुक्त यशवंत डांगे. समवेत अधिकारी व पदाधिकारी.

यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मार्केट विभागाकडून तयार करण्यात आलेला सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात आला. शहरात महानगरपालिकेची ३३ व्यापारी संकुले आहेत. त्यातील ७४२ गाळे भाड्याने दिलेले आहेत. तसेच ७४ खुल्या जागा, सात शाळांमधील ८२ वर्ग खोल्या, दोन मंगल कार्यालये, तीन ठिकाणी पे अँण्ड पार्कसाठी जागा व दोन व्यायामशाळा भाडेतत्वावर देण्यात आल्या आहेत. त्यातील ६८२ भाडेकरूंचे करार संपुष्टात आलेले आहेत. १६१ गाळ्यांमध्ये पोटभाडेकरु आहेत. यासह १३० गाळ्यांमध्ये परस्पर फेरबदल करण्यात आल्याचे महानगरपालिकेच्या सर्वेक्षणात समोर आले आहे. या भाडेकरूंकडे मोठ्या प्रमाणात थकबाकीही आहे. एकूण थकबाकी २५ कोटीहून अधिक आहे.

थकीत भाडे वसुलीसाठी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश देत उपायुक्त, सहाय्यक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली मार्केट विभागाची दहा पथके नियुक्त केली आहेत. भाडे वसुली, करारनाम्यांचे नुतनीकरण, कारवाई या पथकांकडून केली जाणार आहे. थकबाकीदार गाळे धारकांनी सर्व थकबाकी एकरकमी भरल्यास राज्य शासनाच्या निर्देशानुसार अनामत रक्कम व नवीन भाडे निश्चित करून करारनामे करून देण्यात येणार आहेत. ज्या गाळेधारकांनी परस्पर बदल केले आहेत, त्यांना ५० हजार रूपये दंड करण्यात येणार आहे. मुदत संपलेल्या व थकबाकीदार गाळेधारकांना गाळे नुतनीकरण करून घेण्यासाठी ही संधी आहे. या संधीचा लाभ घेऊन तत्काळ थकबाकी भरावी व करार नुतनीकरण करून घ्यावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

अनेक गाळेधारकांनी महानगरपालिकेच्या करारनाम्याचे उल्लंघन करून परस्पर पोट भाडेकरू ठेवले आहेत. त्यांच्याकडेही मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. अशा गाळेधारकांनी थकित रक्कम भरून करार नुतनीकरण न केल्यास त्यांच्यावर कारवाई करून गाळे जप्त करण्यात येणार आहेत. त्यानंतर लिलाव करून गाळे पुन्हा भाड्याने दिले जातील, असा इशाराही यशवंत डांगे यांनी दिला आहे.

मार्गदर्शक
"दिवस आज आहे खास तुम्हाला उदंड आयुष्य लाभो हाच मनी ध्यास.."
आमच्या संस्थेचे चेअरमन व अहमदनगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक
मा. दगडू (मामा) पवार यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
मा.श्री. दगडू (मामा) पवार (चेअरमन)
यशवंत सहकारी ग्राहक भांडार (प्रा.) मर्या. सावेडी, अहिल्यानगर
मा. आ. दादाभाऊ कळमकर (संस्थापक अध्यक्ष) | अशोकराव बाबर (व्हाईस चेअरमन) | प्रकाशराव कराळे (मानद सचिव)

क्षारयुक्त पाण्यामुळे पाइपलाईन वारंवार जाम होते? पाईप खराब होतात?
मग आजच घरी आणा इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर व क्षारयुक्त पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवा...
आजच संपर्क करा...
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistan
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मानव-बिबट्या यांच्यातील वाढत्या संघर्षावर तातडीने उपाययोजना करा

**केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचे राज्य सरकारला निर्देश, खा.निलेश लंके यांची माहिती**



नगर - नगर जिल्ह्यासह राज्यभर वाढत्या बिबटयांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे मानव-बिबट्या यांच्यातील वाढत्या संघर्षावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाला दिले आहेत. या विषयाची वेळोवेळी संसदेत तसेच केंद्र शासनाकडे ठामपणे मांडणी खा.निलेश लंके यांनी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे केंद्रीय मंत्र्यांनी निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात पाठपुरावा करताना खा. लंके यांनी मंत्री भूपेंद्र यादव यांना निवेदन दिले होते. त्यात नमूद करण्यात आले होते की, नगर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील अनेक गावांमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक शेतकरी, महिला, लहान मुले या हल्ल्यांना बळी पडले असून ग्रामीण भागात भीतीचे सावट पसरले आहे. या पार्श्वभूमिवर संवेदनशील भागांत त्वरित संरक्षण यंत्रणा उभारणे, पथके तैनात करणे आणि पीडीत कुटूंबांना तात्काळ मदत मिळावी अशी मागणी खा. लंकेयांनी केली होती.

केंद्र सरकारने यासंदर्भात महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र पाठवून विविध प्रकारचे निर्देश दिले आहेत. त्यामध्ये संवेदशील भागांची ओळख पटवावी.बिबट्याच्या सतत वावरामुळे उच्च धोका निर्माण झालेल्या गावांची यादी तातडीने तयार करावी. त्वरित प्रतिसाद पथके तैनात करावीत. प्रशिक्षित वन कर्मचारी व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली प्रतिसाद पथके तयार करून बिबटया हल्ल्यांना प्रतिसाद देणे अनिवार्य करावे. केंद्रीय मानक कार्यपध्दतीचे पालन करावं.मानव वन्यजीव संघर्षांच्या सर्व घटनांकवर कारवाई करताना केंद्राने जारी केलेल्या मानक कार्यपध्दतीचे काटेकोर पालन करण्यात यावे. पीडितांना तात्काळ मदत, अनुग्रह निधीचे पुनरावलोकन व निर्णयासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी समित्या गठण कराव्यात.

बिबट्याच्या हल्लयात मृत्यूमुखी पडलेल्या किंवा जखमी झालेल्या व्यक्तींना २४ तासांच्या आत आर्थिक मदत देण्यासाठी प्रभावी प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी. बिबटयांना मानवी वस्तीतून रोखण्यासाठी सौर-उर्जेवर आधारित कुंपण, जैव कुंपन, किंवा संरक्षक भिंती उभारण्यासाठी केंद्राकडून निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचा उपयोग करावा. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कलम ११/१ नुसार मानवासाठी धोका निर्माण करणाऱ्या प्राण्यांच्या शिकारीसाठी मुख्य वन्यजीव संरक्षक अधिकाऱ्यांना अधिकार देण्यात यावा असे निर्देश केंद्रीय मंत्र्यांनी दिले आहेत.

### राज्य शासनाने तातडीने अंमलबजावणी करावी

खा. निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या या कार्यवाहीचे स्वागत करत राज्य शासनाने सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी अशी मागणी केली आहे. ग्रामीण भागातील नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. वन विभागाने स्थानिक पातळीवर जागरूकता वाढवून अधिक सजग आणि जबाबदार भूमिका घ्यावी, अशी मागणी खा.लंके यांनी केली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### स्त्रियांचं प्रेममय भावविश्व

प्रेमात पडलेली स्त्री तुम्ही कधी तरी पाहिली असेलच. निसर्गाने स्त्रियांना सौंदर्याचे वरदान दिलंय. प्रेमात पडलेली स्त्री अंतर्बाह्य सुंदर दिसते. स्त्री-विश्वातील भावनांची मांडणी शिल्पा कांबळे यांनी छान मांडली आहे. प्रेमात पडलेल्या स्त्रीच्या चेहऱ्यावर चमक असते. आनंदाचा झरा तिच्या ह्दयातून वाहू लागतो. पण आपल्या समाजात प्रेमाला प्रतिष्ठा आहे का? (विशेषत: स्त्री प्रेमाला?)

माणूस प्रेमात पडतो म्हणजे नेमके काय होते? त्याच्या किंवा तिच्या डोक्यात आनंदवर्धक हार्मोन्स स्त्रावू लागतात! चंचल मन त्या विशिष्ट व्यक्तीवर सगळे लक्ष केंद्रित करते. प्रेम नुसते आंधळे नसते तर मुके व बहिरेही असते. जात्याच भावनिक असणाऱ्या स्त्रिया या प्रेमात अधिकच घायाळ होऊन जातात. त्यांच्या मनात अखंड वाहणारा मायेचा झरा प्रेमात पडल्यानंतर अगदी पूर आलेल्या नदीसारखा वाहू लागतो.

पुरुषांचे प्रेम हे स्त्रियांच्या प्रेमापेक्षा वेगळे असते. 'Men are from mars, Women are from Venus' या जॉन ग्रे यांच्या पुस्तकात स्त्री पुरुषांमधील हा स्वाभाविक भेद रंजक पद्धतीने उलगडून दाखवला आहे. पुरुषांच्या प्रेमात मालकी हक्काची भावना जास्त असते तर स्त्रीचे समर्पण भाव अनमोल असते.

पुरुषप्रधान संस्कृतीत प्रेमात (आणि अफेअर्स) नापास झालेल्या पुरुषाला पुन्हा लग्न, प्रेम करण्यासाठी हॉल तिकीट मिळते पण स्त्रीला मात्र पुन्हा चान्स देत नाही. तिला नावे ठेवतात. तिलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते.

विजय तेंडूलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे...' या नाटकातील अविवाहीत 'बोणारे बाई' आठवतात का?

काळ बदलतोय तरी पण स्त्रीला मुक्तपणे प्रेम करण्याची मुभा देतो का? तर अजूनही नाहीच म्हणावे लागेल. सिनेमात दिसते तसं निर्व्याज प्रेम तिला खरच मिळते का? एरिक फ्रॉमच्या 'द आर्ट ऑफ लव्हिंग' या पुस्तकात प्रेमाच्या गुंतागुंतीला शास्त्रोक्त पद्धतीने सामोरे जाण्याचा प्रयत्न आहे.

आपल्या जीवनात प्रेम असणं अत्यावश्यक., तरी पण मला वाटते 'तिच्या' प्रेमाची पूर्ण महती आपण पुरुषांना कमीच कळते. आज आणि हजारो वर्षांपासूनची कुटुंब व्यवस्था, भारतीय संस्कृती तिच्या प्रेम-समर्पणावर टिकून आहे. तिचं खरं प्रेम मिळणारा पुरुष भाग्यवंतच ठरतो...तिच्या समर्पण प्रेमास सलाम.



माजी नगरसेवक दशरथ शिंदे यांच्या दीडशे कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. (छाया - लहू दळवी)

## अहिल्यानगर जिल्ह्यातील माजी सभापती नंदा शेंडगे, माजी नगरसेवक दशरथ शिंदे यांचा शिवसेनेत प्रवेश

नगर -अहिल्यानगर जिल्ह्यातील माजी सभापती नंदाताई शेंडगे व माजी नगरसेवक दशरथ शिंदे यांच्या दीडशे कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी संपर्कप्रमुख शंभूराज देसाई, सचिव संजय मोरे, जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले, अभिषेक भोसले, अमोल हुंबे उपस्थित होते. यावेळी राहुरी तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी अनिल शेंडगे, माजी नगरसेवक देवळाली प्रवरा गणेश भांड, हरिभाऊ हापसे, राधाबाई हापसे, पोपट शेळके, अर्जुन शेटे, श्रीकृष्ण भुजाडे, नरेंद्र रिंगे, पप्पू घोलप, प्रमोद बर्डे, सोमनाथ खांदवे,सुनील भांड, रवींद्र शिंदे, संजय बर्डे, किरण देशमुख, किशोर मोरे, सिद्धार्थ तनपुरे, गणेश पवार, राजेंद्र भुजाडे, बबलू कारंडे, संकेत घुले, नगर तालुक्यातील संगीता जाधव, सुनिता सासोडे, राणी गरुडकर, इंदुबाई लाटे, अनिता भोर, सुनीता भालसिंग, शशिकला इंगळे, शोभा माने आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

## २५ हजारांची लाच घेताना तलाठ्यास रंगेहाथ पकडले

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

नगर - तहसीलदारांनी घरकुलासाठी अधिकृतरित्या वाळू वाहतूक करण्यासाठी परवानगी दिल्यानंतरही कामगार तलाठ्याने कारवाईची भीती दाखवून वाहनधारकाकडे ३० हजार रुपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना नगरच्या लाचलुचपत पथकाने ७ जुलै रोजी तलाठ्यास संगमनेर मध्ये रंगेहाथ पकडले. याप्रकरणी तलाठी संतोष शेलार याच्यावर संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी, की कनोली (ता.संगमनेर)गावात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार मोफत ५ ब्रास वाळू वाटप सुरू करण्यास संगमनेरच्या तहसीलदारांनी मंजुरी दिलेली आहे. सदर वाळू वाटप करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर वाळू वाहतुकीसाठी पाच ट्रॅक्टर वाहनांना व वाळू उपसा करण्यासाठी एक जेसीबी व एक फरांडी ट्रॅक्टरला मंजुरी मिळाली आहे. तहसीलदारांनी घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाहतूक करण्यासाठी मंजुरी दिलेल्या ट्रॅक्टरमध्ये तक्रारदार यांच्या मालकीचा एक ट्रॅक्टर आहे.

तक्रारदार व त्यांचे मित्र हे त्यांच्या ट्रॅक्टरद्वारे वाळू वाहतूक करण्याचे कामकाज करत असताना कामगार तलाठी संतोष शेलार, तलाठी कनोली यांनी तक्रारदार व त्यांचे मित्र तसेच इतर वाळू वाहतूक करणार्या वाहनधारकांना तुम्हाला वाळू वाहतूक करायची असेल तर मला ३० हजार रुपये द्यावे लागतील. अन्यथा तुमच्यावर अवैधरित्या वाळू वाहतूक करीत असल्याबाबत कारवाई करेल, सदरची कारवाई टाळायची असेल तर ३० हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावर तडजोडीअंती २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना तलाठी शेलार यास नगर लाचलुचपत विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक चंद्रकांत काळे, पोलीस कॉन्स्टेबल गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, चालक पोलीस हवालदार हारून शेख यांच्या पथकाने संगमनेरात रंगेहात पकडले. त्यामुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

## दामु वैराळ यांचे अल्प आजाराने निधन


नगर - विळदघाट येथील रहिवासी दामु नाथु वैराळ (वय ६९) यांचे ७ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राहुल, नाना वैराळ यांचे ते वडील होत.

## गणेश गायकवाड यांचे ह्दयविकाराने निधन



नगर - तारकपूर येथील विराज कॉलनीतील रहिवासी गणेश अरुण गायकवाड (वय ३५) यांचे ६ जुलै रोजी ह्दयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे आई, पत्नी, १ भाऊ, भावजय, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. महेश गायकवाड यांचे ते बंधू होत.

## बशीर शेख यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथील बशीर मगबुल शेख (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. श्री दुर्गादेवी विद्यालय ढवळपुरी, ता. पारनेर येथील प्राचार्य आदम शेख व आसिफ शेख यांचे ते वडिल होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर कब्रस्तानमध्ये अंत्यविधी करण्यात आला.

## सुमनबाई खैरनार यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील सुमनबाई श्रावण खैरनार (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने नधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुन, जावई, नातवंडे, पतवंडे, नातसूना असा परिवार आहे. डॉ. विश्वास खैरनार यांच्या मातोश्री, डॉ. विक्रांत खैरनार व डॉ.प्रशांत खैरनार यांच्या आजी होत.

## शामलाल (आप्पा) परदेशी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीराम हार्डवेअरचे कर्मचारी शामलाल (आप्पा) सिताराम परदेशी (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. स्टेट बँक चौकातील स्वामी समर्थ ट्रॉफी वर्ल्डचे मालक विनोद परदेशी व ओमप्रकाश परदेशी यांचे वडील, महावितरणचे सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश परदेशी यांचे थोरले बंधू, शिवप्रसाद, हेमंत, राजेश व अजय परदेशी यांचे चुलते, चि.तेजस व रुद्र परदेशी यांचे आजोबा होत.

## रमाकांत यन्नावार यांचे वृद्धापकाळाने निधन



छत्रपती संभाजीनगर - पाटबंधारे खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी आणि एन-२ सिडको विवेक सहकारी गृह निर्माण संस्थेचे संस्थापक आणि माजी अध्यक्ष रमाकांत चंद्रैय्या यन्नावार (८५) यांचे ७ जुलै रोजी सकाळी ८.१५ वा. दुःखद निधन झाले. त्यांच्यावर ८ जुलै रोजी सकाळी ९ वा. मुकुंदवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली. सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

## नागरिकांच्या सूचना व अभिप्रायासाठी ९ जुलैला बैठक

**माहिती व जनसंपर्क विभागाचे सुधारित व सुलभ धोरण**

नगर - 'विकसित महाराष्ट्र २०४७' या विशेष उपक्रमांतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाचे भविष्यातील सुधारित व सुलभ धोरण आखले जात आहे. या संदर्भात नागरिकांच्या सूचना व अभिप्राय मिळवण्यासाठी ९ जुलैला दुपारी ३ वाजता जिल्हा माहिती कार्यालय, आकाशवाणी केंद्रासमोर, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, अहिल्यानगर येथे बैठक आयोजित केली आहे. नागरिकांनी उपस्थित राहून आपले अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी केले आहे.

भारत सरकारने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्याचे राज्याचे ध्येय आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक क्षेत्राचा अर्थव्यवस्थेवर ठसा उमटावा यासाठी 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन जाहिर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मे ते २ ऑक्टोबर या १५० दिवसांच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमात 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्यात येईल. त्यात दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशा टप्प्यांनुसार उद्दिष्टे निश्चित करण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. त्यानुसार शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाचे सुधारित व सुलभ धोरण ठरवले जात आहे. नागरिकांनी या संकल्पनेत आपले योगदान द्यावे व बैठकीत सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री.पाटील यांनी केले आहे.

## नगर तालुक्यात ९ जुलैला बैलगाडा शर्यत

नगर - भोरवाडी येथे ९ जुलै रोजी नगर तालुका केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विजेत्यांना मोटारसायकल, फ्रीज, एलईडी टीव्ही, कुलर या वस्तूंसह रोख असे बक्षिस दिले जाणार आहे. भोरवाडी येथील श्री हनुमान सप्ताह यात्रा उत्सवानिमित्त राहुल जाधव युवा मंचच्या वतीने करण्यात येत आहे. ९ जुलै रोजी सकाळी ९ वाजेपासून बैलगाडा शर्यत सुरू होणार आहे. बैलगाडा शर्यतीत राज्यभरातील गाडा चालक भाग घेणार आहेत. माहितीसाठी विजय लोमटे (मो. ९७३०५१४१४१) व अक्षय पानसरे (मो.७२७६७७६९७६).

## लक्ष्मीबाई वासाल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - प्रेमदान हडको येथील रहिवासी लक्ष्मीबाई लक्ष्मणराव वासाल (वय ७८) यांचे ७ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातू असा परिवार आहे. महेश वासाल यांच्या त्या मातोश्री होत.

## शकुंतलाबाई आवारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - इंदोरी येथील रहिवासी शकुंतला भाऊराव आवारी (वय ९५) यांचे ८ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर इंदोरी प्रवरातिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार हेमंत आवारी व सुरेश आवारी यांच्या त्या मातोश्री होत.

## केबल ऑपरेटर शाम मापारी यांचे निधन



श्रीरामपूर - कोपरगाव शहरातील शनि मंदिर जवळील केबल ऑपरेटर शाम रंगनाथ मापारी (वय ५०) यांचे निधन झाले.

शाम मापारी हे अंबिका तरुण मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांच्या श्चात आई शिला मापारी, पत्नी सुरेखा मापारी, मुलगी कु.साक्षी मापारी व पुतणे असा परिवार आहे. श्रीरामपूर येथील प्रमोद करंडे यांचे ते मेहुणे होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे लाटली शासनाची शिष्यवृत्ती

**नामांकित संस्थेत दाखविला विद्यार्थ्यांचा प्रवेश, दोघांवर गुन्हा दाखल**

नगर - केंद्र सरकारच्या वतीने अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी ७ विद्यार्थ्यांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून त्यांचा नगर तालुक्यातील एका नामांकित संस्थेत प्रवेश दाखवून शासनाची ३८ हजार ९०० रुपयांची शिष्यवृत्ती दोघांनी लाटल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोघांच्या विरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा परिषदेतील योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब दादाबा बुगे (वय ५३. रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. आरोपी एन.डी. अन्सार आणि नूर हुसेन (दोघांचे पूर्ण नाव पत्ता माहित नाही) यांनी ही शिष्यवृत्तीची रक्कम लाटली आहे. हा प्रकार सन २०२१-२२ मध्ये झाला असून शिक्षण विभागाने केलेल्या तपासणीत तो समोर आला आहे. या दोघा आरोपींनी अल्पसंख्याक समाजातील ७ विद्यार्थ्यांचे बनावट कागदपत्रे तयार करून त्यांचा नगर तालुक्यातील वाळकी येथील एका शिक्षण संस्थेत प्रवेश दाखविला. त्यानंतर या विद्यार्थ्यांचे मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती मिळण्यासाठीचे अर्ज भरून ते शिक्षण विभागाला सादर केले.

शिक्षण विभागाने या अर्जात नमूद बँक खात्यात शिष्यवृत्तीची ३८ हजार ९०० रुपये एवढी रक्कम जमाही केली. नंतरच्या कालावधीत तपासणी मध्ये सातही विद्यार्थ्यांची रक्कम एकाच खात्यात गेल्याचे लक्षात आल्यावर संबंधित शिक्षण संस्थेकडे चौकशी करण्यात आली. त्यात तर या संस्थेत अशा कोणत्याही विद्यार्थ्यांचा प्रवेश झालेला नसून या संस्थेत ११ व १२ चे वर्ग आहेत. त्याखालील वर्गच नसल्याचे समोर आले. त्यामुळे या फसवणुकीसाठी संबंधित संस्थेचा नावाचा ही या आरोपींनी गैरवापर केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

## भूमिअभिलेख कार्यालयात काम करणाऱ्या खाजगी इसमाकडून शेतकऱ्याला मारहाण

नगर - नगर तालुका भूमिअभिलेख कार्यालयातील अनागोंदी कारभार शिवसेनेने चव्हाट्यावर आणल्यानंतर आणखी एक गंभीर प्रकार समोर आला आहे. या कार्यालयात काम करणाऱ्या एका खाजगी इसमाने एका शेतकऱ्याला शिवीगाळ, मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना ७ जुलै रोजी सायंकाळी नगर तालुक्यातील अरणगाव येथे घडली आहे.

याबाबत शेतकरी कचरू कोंडीबा दळवी (रा. अरणगाव, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी भागीनाथ रघुनाथ शेळके (रा. शेळके मळा, अरणगाव) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपी शेळके हा भूमिअभिलेख कार्यालयात अशासकीय कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. फिर्यादी दळवी यांनी त्याच्याकडे जमिनीच्या मोजणी साठी ३-४ वर्षांपूर्वी पैसे दिले होते. मात्र त्याने ते शासकीय खात्यात भरले नाही, नेहमी उडवाउडवीची उत्तरे दिली.

त्यामुळे दळवी यांनी पुन्हा भूमिअभिलेख कार्यालयात पैसे भरून जमिनीची मोजणी करून घेतली होती. त्यावेळी शेळके याची भूमिअभिलेख कार्यालयात त्यांनी तक्रार केली होती. तेव्हापासून ते त्यास वारंवार पैसे मागत होते. ७ जुलै रोजी दुपारी ४.१५ च्या सुमारास त्यांची गावात भेट झाल्यावर दळवी यांनी त्यास पुन्हा पैसे मागितले असता तू माझी तक्रार का केली? आता पैसे कशाचे मागतो असे म्हणत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे दळवी यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून शेळके याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माळीवाडा परिसरात रात्रीच्या अंधारात संशयास्पद फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर - माळीवाडा परिसरात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत संशयास्पद हालचाली करीत काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने दुकानाच्या आडोशाला दबा धरुन बसलेल्या दोन इसमांना कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई माळीवाडा येथील शिवसंग्राम वाईन्स दुकानाजवळ ८ जुलै रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

कोतवाली पोलीस रात्री गस्त घालत असताना माळीवाडा येथील शिवसंग्राम वाईन्सजवळील एका दुकानाच्या आडोशाला रात्रीचे अंधाराचा फायदा घेत दोन इसम थांबलेले दिसून आले. त्यांच्या हालचाली संशयास्पद असल्याने पोलिसांनी दोघांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता ते पळून जाण्याचा प्रयत्न करु लागले. मात्र, पोलिसांनी त्यांना जागीच पकडले. त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे अब्दुल सादिक अब्दुल खालिक (वय ३३, रा. बाळापुर, अकोला) व अलीम अहमद शेख चांद (वय २८, रा. बडी मस्जिद जवळ, बाळापुर, अकोला)अशी सांगितली. पोलिसांनी त्यांच्याकडे थांबण्याचे कारण विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर न देता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांचा उद्देश गुन्हा करण्याचा असल्याचा संशय पोलिसांना आल्याने पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार लक्ष्मण बोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम १२२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास महिला पोलीस नाईक वर्षा पंडित या करीत आहेत

# गृहिणी

## आरोग्य

### सोडवा युरिक ॲसिडची समस्या

आपल्या शरीरात युरिक ॲसिडची पातळी वाढली तर त्यामुळे संधिवात, सांधेदुखी आणि किडनी स्टोन सारख्या समस्या उद्भवू शकतात. युरिक ॲसिड ही अशी समस्या आहे की जर आपण वेळीच त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर ती हळूहळू वाढू लागते. ही समस्या सहसा आपल्या जीवनशैली आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे उद्भवते. यामुळे हाडांना मोठे नुकसान होऊ शकते. ॲपल सायडर व्हिनेगर शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास आणि वाढलेल्या यूरिक ॲसिडचे संतुलन राखण्यास मदत करते. जर एखाद्याला खूप जास्त यूरिकची समस्या असेल तर त्यांनी दिवसातून दोनदा १-२ चमचे ॲपल सायडर व्हिनेगर एका ग्लास पाण्यात मिसळून प्यावे. त्याचप्रमाणे युरिक ॲसिडच्या रुग्णांनी पुरेशा प्रमाणात पाणी प्यावे. यामुळे मूत्रपिंड स्वच्छ राहण्यास आणि मूत्रमार्गे युरिक ॲसिड बाहेर टाकण्यास मदत होते. त्यामुळे या लोकांनी दररोज किमान ८ ते १० ग्लास पाणी प्यावे.

## पाककला

### गव्हाचे कुरकुरे

**साहित्य :** १ कप गव्हाचे पीठ किंवा मैदा, १ टेबलस्पून कसूरी मेथी, १/२ टीस्पून जीरे, १ टीस्पून ओवा, १/४ टीस्पून हळद, चवीप्रमाणे मीठ, २ टेबलस्पून तेल, तेल,

**कृती :** एका बाऊलमध्ये गव्हाचे पीठ घेणे. त्यात सर्व मसाले घालून मिक्स करून घेणे. ओवा व कसुरी मेथी हातावर कुस्करून घालणे. म्हणजे त्याचा स्वाद छान लागतो. सर्व व्यवस्थित मिक्स करून झाल्यावरती तेल घालून सर्व पिठाला व्यवस्थित चोळून घेणे.पिठाची मूठ तयार झाली पाहिजे. थोडे-थोडे पाणी घालून चपातीला कणिक मळतो, त्यापेक्षा थोडीशी घट्ट कणिक मळून घेणे. गॅसवर कढईत तेल घालून, तापत ठेवावी. पीठ एकदा व्यवस्थित मळून घतेल व त्याचे तीन उंडे तयार करून घ्यावे. किचन मधील कात्री घेऊन, हव्या त्या आकाराचे छोटे-छोटे तुकडे कात्रीने करून घ्या. तेल तापल्यानंतर गॅस मध्यम आचेवर ठेवावा. कढईत जेवढे बसतील, तेवढे कुरकुरे घालून घेणे. सतत हलवत राहणे दोन्ही बाजूंनी छान लाल झाली ते काढून घ्यावे अशा प्रकारे सर्व कुरकुरीत तळून घेणे.

## वास्तू

### दारामागे कपडे ठेवू नये

दाराच्या मागे कपडे लटकवणे शुभ मानले जात नाही आणि त्यामुळे वास्तुदोष होऊ शकतो. वास्तुशास्त्रानुसार घराचा प्रत्येक दरवाजा हा सकारात्मक उर्जेच्या प्रवेशाचा आणि नकारात्मक उर्जेच्या बाहेर जाण्याचा मुख्य मार्ग आहे. जेव्हा कपडे दाराच्या मागे टांगले जातात तेव्हा ते उर्जेच्या प्रवाहात अडथळा आणते. परिणामी घरात अशांतताआणि आर्थिक समस्या वाढू शकतात.

## सल्ला

डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे घालविण्यासाठी कोल्ड कॉम्प्रेस ते डोळ्यांभोवतीच्या त्वचेवर १०-१५ मिनिटे ठेवा आणि नंतर ते काढून टाका.

## सौंदर्य

✲ रिकामा पोटी १ टोमॅटो खाल्ल्याने केस लवकर पांढरे होत नाहीत.

✲ रिकाम्या पोटी ताक प्यायल्याने पोटदुखी बरी होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. ९ जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, मूळ २८।५०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. मानसिक स्थिती आनंददायक राहील. कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल.

**वृषभ :** वैवाहिक जीवनात सुख मिळेल. आनंदाची बातमी मिळेल. निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा.

**मिथुन :** मागील उधारी उसनवारी वसूल होईल. शुभ वार्ता देखील मिळतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल.

**कर्क :** मित्रांचा सहयोग मिळेल. आरोग्य नरम-गरम राहील. खाण्या-पिण्याविषयीची पथ्य पाळावी लागतील. आरोग्य देखील उत्तम राहील. कौटुंबिक सहयोग मिळेल.

**सिंह :** आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. नोकरदारांनी इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी. बेपर्वाईने वागु नका.

**कन्या :** आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. कार्यालयामध्ये सहकार्य मिळेल. व्यापार व्यवसायात आशादायक परिणाम मिळतील.

**तूळ :** सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. आपणास समाधानकारक स्थिती मिळेल.

**वृश्चिक :** पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांचा सल्ला घेऊन पाउल टाका.

**धनु :** मोठ्यांचा सल्ला घ्या. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे.

**मकर :** मित्रांचा पाठिंबा मिळेल. भावनात्मकतेमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.


**कुंभ :** जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळा. आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल.

**मीन :** कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. खर्च अधिक होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. संभाषणात सावधगिरी बाळगावी लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१६

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२१५ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) प्रगती; वाढ; वृद्धी; डेव्हलपमेंट ४) कावळ्याचे ओरडणे ८) एक पक्षी ९) आस्था; आपुलकी १०) योग्य; रास्त १२) एक प्रकारची दारू १३) बसक्या नाकाची १५) हार; माला; बरोबरी; तुलना १७) भक्त किंवा सेवक यांचा समूह १८) ज्ञानी; जाणकार; समंजस २१) डावा; वाईट २२) हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्त्राव २३) पैसा; अडका २४) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा २५) आत न जाता ; बाहेरून

**उभे शब्द :-** १) चौकशी; परामर्ष २) सर्पाने टाकलेली त्वचा ३) नाजूक; सुकुमार; कोमल ४) उसाचा कढविलेला घट्ट रस ५) मरल्याची खूण; लांबट उठाणू ६) एक पक्षी; काग; वायस; कावळा ७) अंथरूण वगैरेची गुंडाळी ११) अनेक वस्तू एकत्र करणे किंवा जमविणे १३) मोठे गाव; शहर १४) पदार्थाचा अतिलहान अंश १६) रसाने भरलेले; रसाळ १९) मुंबईतील एक भाग; लाकडी जिना; पायरी २०) फूल; पुष्प २१) सरळसोट लांब लाकूड किंवा बांबू २३) मद्य; मदिरा

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : प्रत्येकाच्या मनात जागा करणे गरजेचे नसते काहींच्या डोळ्यात खटकण्यात पण वेगळीच मजा असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'लॉयर' आणि 'ॲडव्होकेट' यात काय फरक आहे?

पूर्वीच्या काळात कायद्याची पदवी असलेल्या व्यक्तींकडे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या दिल्या जात ! १९ वे शतक पाहिलेत तर ब्रिटिश साम्राज्य अनेक पारतंत्र्यात असलेल्या देशांसाठी अनेक कायदे बनवत होते, त्याचवेळेला न्यायालयात खटला चालू असताना वकील सुद्धा काम बघत होते ! मग यावरून तीन वेगवेगळे नावे पुढे आलीत

ज्याने कायद्याचा अभ्यास केलेला आहे, कायद्याची पदवी घेतलेली आहे, आणि ब्रिटिश शासनाला ही व्यक्ती कायदे बनवण्यात मदत करत, आता कायद्याचा अभ्यास असलेली व्यक्ती ह्यासाठी घेत की नवीन कायद्याच्या काही तरतुदी न्यायाच्या कक्षेत बसतात का ? एखादी अशी तरतूद तर नाही जी पूर्वी बनवलेल्या कायद्याशी विसंगत असेल (an act of law making), जेणेकरून बनवले जाणारे कायदे कमीत कमी सदोष असतील ! या व्यक्तींना लॉयर म्हणत !

दोन पक्षांमधील न्यायालयीन तंट्यामध्ये दोन कायद्याची पदवी घेतलेले लोक अशा पक्षांची बाजू न्यायमूर्तींसमोर मांडत त्यामुळे अशा कायद्याची पदवी घेतलेल्या व्यक्तीला ॲडव्होकेट म्हणत !

ब्रिटिश न्यायालयात वादविवाद मांडण्यासाठी नियुक्त केल्या गेलेल्या व्यक्तीला बॅरिस्टर म्हणत ! कायद्याची पदवी सहित अनेक पास झालेल्या व्यक्तीची नेमणूक बॅरिस्टर म्हणून करत ! बॅरिस्टरचे काम वकिलांपेक्षा मोठे असते ! नुसती केस लढायची नसते तर कायदे हे सुरळीत आहेत का, त्यात काही बदल आवश्यक आहेत का यांसाठी सुद्धा नेमणूक करत ! सरकारला आपले सुझाव देत ! रिसर्च करणे, मार्गदर्शन करणे ही कामे बॅरिस्टरची असत ! हे कधी कधी न्यायाधीशाला सुद्धा मार्गदर्शन करत ! थोडक्यात समजून घ्या, कायद्याचा प्रोफेसर, जो dvocate सुद्धा आहे, Lawyer सुद्धा आहे !

कायदा बनवण्याचे काम Lawyer ने केले, ह्या कायद्याशी संबंधित तंट्यामध्ये ॲडव्होकेटने आपापल्या पक्षाची बाजू कोर्टात मांडली, बॅरिस्टर ने dvocate ला मार्गदर्शन केले, ह्या कायद्यात बदल असल्यास ते संसदेला कळवले, आणि आपले सुझाव दिलेत, ह्या सूचनांवर त्यांनी समिती / लवादासमोर वादविवाद केलेत ! नंतर पुन्हा पुढचे काम Lawyer कडे आले ! आज रोजी ह्या तिघांना भारतात कोणत्याही एका नावाने संबोधतात ! ह्या क्षेत्रांमधून आता specialization एवढे आवश्यक उरलेले नाही ! आणि प्रत्येक गोष्टीला specific बनवणारी ब्रिटिश मानसिकता सुद्धा राहिली नाही !

### एका दगडाची किंमत

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक हिरा व्यापारी होता जो हिऱ्यांचा एक महान तज्ञ मानला जात असे, परंतु एका गंभीर आजारामुळे त्याचे निधन झाले. त्याला पत्नी आणि एक मुलगा होता. मुलगा मोठा झाल्यावर त्याची आई म्हणाली- बेटा, मरण्यापूर्वी तुझ्या वडिलांनी हा दगड सोडला होता, तू तो बाजारात घेऊन जा आणि त्याची किंमत जाणून घे, लक्षात ठेव तुला फक्त किंमत शोधायची आहे, तो विकायचा नाही.

मुलगा दगड घेऊन बाहेर पडला, सर्वप्रथम त्याला भाजीपाला विकणारी एक महिला भेटली. अम्मा, या दगडाच्या बदल्यात तू मला काय देऊ शकतेस?, त्या तरुणाने विचारले. जर तुम्हाला द्यायचेच असेल मी दोन गाजरांच्या बदल्यात देईल... ते वजन करण्यासाठी उपयुक्त ठरेल. भाजी विक्रेता महिला म्हणाली.

तरुण पुढे सरकला. यावेळी तो एका दुकानदाराकडे गेला आणि त्याच्याकडून दगडाची किंमत जाणून घेऊ इच्छित होता. दुकानदार म्हणाला- याच्या बदल्यात, मी जास्तीत जास्त ५०० रुपये देऊ शकतो. जर तुम्हाला द्यायचे असेल तर द्या, नाहीतर पुढे जा.

यावेळी तो तरुण एका सोनारकडे गेला. सोनाराने दगडासाठी २० हजार रुपये देईल असे सांगितले.

मग तो एका प्रतिष्ठित हिऱ्याच्या दुकानात गेला जिथे त्याला दगडासाठी १ लाख रुपयांची ऑफर मिळाली आणि शेवटी तो तरुण शहरातील सर्वात मोठ्या हिऱ्या तज्ञाकडे गेला आणि म्हणाला, कृपया मला या दगडाची किंमत सांगा. तज्ञाने दगडाची काळजीपूर्वक तपासणी केली आणि तरुणाकडे आश्चर्याने पाहत म्हणाला, हा एक अमूल्य हिरा आहे, कोट्यवधी रुपये देऊनही असा हिरा मिळणे कठीण आहे.

तात्पर्य : जीवन हे देखील हिऱ्याप्रमाणे अमूल्य आहे आपण ते वाया घालवू नये तर त्याचे मूल्य ओळखावे.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

मुझे खुशी है कि आप प्रेम और भक्ति से भजन सिमरन कर रहें हैं, जिसके फलस्वरूप आपको सतुरु की दया का आशीर्वाद मिला है १ आपको सतुरु की कृपा से जीते जी मरने का अनुभव मिला है और सौभाग्य से आप इस ऊँचे सत्य के गवाह हैं। अनेकों प्रकार के आशीर्वादों के प्रति आपकी कृतज्ञता स्मरणीय हैं; इससे आपको और अधिक आंतरिक शांति तथा सही समझ की भेंट मिलेगी ।

प्रभु के सच्चे जिज्ञासु पर किसी प्रकार की कोई बंदिश नहीं होनी चाहिए। स्वाभाविक प्रतिक्रिया अंतर से आती है। प्रश्न यह है कि बाहर से कैसे हटा जाए, ताकि अंतर में उच्चतर किस्म का अनुभव मिल सके। सत्य की खोज की चाहत हर इंसान के अंदर विद्यमान है और वह तब तक संतुष्ट नहीं हो सकता या सकती, जब तक जिंदगी की गुत्थी को स्वयं ना सुलझा लें । यहाँ पर भूखों के लिए भोजन है और प्यासों के लिए पानी है। ऊपर बैठा प्रभु हमारे विचारों को देखता है, हमारी इच्छाएँ जानता है और उनके अनुसार इंतजाम करता है।

एक बार जिंदगी के रहस्य का सवाल हमारे जीवन में आ जाए, तो उसका समाधान किसी ना किसी समय अवश्य मिलेगा। जो कुछ मैंने अपने सतुरु के चरण-कमलों में सीखा है, सत्य के जिज्ञासु उससे अवश्य ही लाभान्वित होंगे, यदि वे इसका अनुसरण करें ।

ध्यान-अभ्यास ५१ - संगीत में आकर्षित करने की लाजवाब शक्ति है। अंदाजा लगाइये कि अंतर का दिव्य संगीत कितना शक्तिशाली और खींचने वाला होगा ! यदि हम प्रभु से अपनी आत्म का मिलाप कराना चाहें, तो आंतरिक संगीत हमें वहाँ तक ले जाएगा।

मैने आपके कुंडलिनी के अनुभव के बारे में पढ़ा, जो आपकी जानकारी के बिना ही जागृत हो गई थी और पाँच पवित्र एवं सिद्ध नामों के जाप से तथा अपनी इच्छा शक्ति की सहायता से, आप इसके असर से बचने में सफल रहे ।

सिद्ध नामों का जाप करते रहना, हमेशा अच्छा रहता है, जो कि किसी भी बाहरी दुर्घटना से हमारी रक्षा करता है । आप इस सर्पिल (कुंडलिनी) शक्ति को जागृत करने के बारे में न सोचें, क्योंकि ऐसा करना खतरे से खाली नहीं है। विस्तृत जानकारी के लिए आप कृपया योग: एक तुलनात्मक अध्ययन नामक पुस्तक को देखें, जहाँ यह विषय दीक्षितों के फायदे के लिए, सावधानी से समझाया गया है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

थी उसकी फोटो ली गयी तो उसमें उस के प्रेमी का फोटो आ गया। अगर आप मन में किसी को फल देते हैं तो सच में मन में आप के संकल्पों से फूल बन जायेगा और करीलियन कैमरे में ये दिखेगा और उस व्यक्ति को ऐसा ही सकून मिलेगा जैसे वास्तविक रूप में फूल देने पर होता है। अगर आप किसी की मन में आरती उतारते हैं तो आप के संकल्पों में सचमुच थाली और अगरबत्ती बन जायेगी और उस व्यक्ति को ऐसे ही महसूस होगा जैसे सच्ची सच्ची में उसकी आरती उतार रहे हैं। अगर आप किसी से मन में प्यार करते हैं तो आप के संकल्पों में गुलाब का फूल बन जायेगा और उससे सेंट या चंदन जैसी सुगंध निकलेगी जो वातावरण में फैलेगी और उस व्यक्ति को भी पहुंचेगी तभी कहते हैं प्यार कभी छुपता नहीं, सभी को पता चल जाता है। मां बाप को तुरंत पता चल जाता है जब उनके बच्चे किसी ऐसे रास्ते पर चलते हैं। जब भगवान से प्यार करते हैं तो मन में ऐसे फूल बनने लगते हैं जिनसे अदूतीय सुगंध पैदा होती है जिस से सभी जीव जन्तु और व्यक्ति आकर्षित होते हैं। उन्हे बहुत अच्छा लगता है। सभी की मनोभावना बदलने लगती है। जब हम शांति के संकल्प करते हैं तो हमारे मन से सफेद सफेद फूल निकलने लगते हैं जो लोगो से टकराते हैं और उन्हें ऐसी खुशबू मिलती है जिस से उन्हे शांति महसूस होती है। उन्हे विश्वास हो जाता है कि अब आप से उन्हे कोई खतरा नहीं है। इसलिये युद्ध विराम के लिये सेना सफेद झंडा एक दूसरे को दिखाती है। जब हम किसी को शाबास देते हैं तब हमारे मन से निकले संकल्प हाथ का रुप धारण कर लेते हैं जो उनके सिर व पीठ पर सहलाने का अनुभव कराते हैं और बहुत अच्छा अनुभव करने लगते हैं। इस के इलावा उस समय जिस चीज का सोच रहे हैं जैसे फूल डाल रहे हैं या कुछ इनाम देने का सोच रहे हैं तो मन में उसी वस्तु की आकृति बन जायेगी। सहयोग देने का जब संकल्प करते हैं तो मन में एक दूसरे के साथ शेक हैण्ड की आकृति बन जायेगी। किसी को धन देने का सोचते हैं तो संकल्पों में आप धन देते हुये दिखेंगें। अगर गाड़ी देना चाह रहे हैं तो संकल्पों में गाड़ी बन जायेगी और उसकी चाबी देते हुये दिखेगें। जब हम दया भाव रखते हैं तो हमारे मन में बने फूलों से ऐसी सुगंध निकलती है जो लोगो में दया करने के विचार चलने लगते हैं। गहन साधना में हमारे संकल्पों से छोटे छोटे फूल या सैंट के कणों की बरसात सी वातावरण में होने लगती है, जिसकी खुशबू से शांति फैलती है और लोग वैर भाव भूल जाते हैं। उपरोक्त वर्णित आकृतियों या इनसे मिलती जुलती आकृतियां मन अपने आप अलग अलग परिस्थियों में बना लेता है। हां ये पक्का है आकृति या रेखाएं संकल्पों से बनती हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मास्तर :** सांगा शुन्यापेक्षा लहान संख्या कोणती आहे?

**पिंटू :** आहे ना **मास्तर :** कोणती आहे?

**पिंटू :** टिंब

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ ऑलिम्पिक स्पर्धांची सुरुवात कोठे व कधी झाली?

- १८९६ मध्ये अथेन्स (ग्रीक)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**१. गर्भधारणेपूर्वी घ्यावयाची काळजी :** बाळ सुदृढ, हशार व बुद्धिमान होण्यासाठी गर्भधारणेपूर्वीपासूनच काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्या घरी अचानक आलेल्या पाहुण्यांचे आदरातिथ्य व्यवस्थित करता येत नाही; परंतु हेच पाहुणे येणार हे आधीच काही दिवस माहीत असेल, तर त्यांचे आदरातिथ्य आनंदाने व्यवस्थित करता येते. तसेच आपल्या घरी कायमस्वरूपी येणारा छोटासा पाहुणा म्हणजेच बाळ हे जर नियोजनपूर्वक घरी आणले, तर त्याची शारीरिक, मानसिक व बौद्धिक क्षमता नक्कीच वाढवू शकतो. गर्भधारणेपूर्वी दोघा पती-पत्नींची आरोग्य तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करून घ्यावी. तसेच दोघांच्याही रक्त, लघवीच्या तपासण्या करणे आवश्यक आहे. रक्ताचे प्रमाण कमी असेल, तर गर्भधारणेपूर्वीच त्यावर उपचार करावेत.

### बौद्धिक विकास कसा करावा?

तपासण्यांमधून जर काही शारीरिक व्याधी लक्षात आल्या तर सुरुवातीला त्यावर उपचार करून घेणे आवश्यक आहे.

**पंचकर्माद्वारे शरीरशुद्धी -** बीज जर शुद्ध असेल, तर 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' म्हणजे त्यातन निर्माण होणारे मूल देखील तेजस्वी, आरोग्यपूर्ण संस्कारक्षम व बुद्धिमान जन्माला येते. भावी माता-पित्यांनी स्त्रीबीज व पुरुषबीज शुद्धी करण्यासाठी पंचकर्म करून घ्यावे. आपल्या कुटुंबामध्ये वंशपरंपरागत जे आजार असतात, ते आजार आपल्या बाळामध्ये येण्याचे प्रमाण नक्कीच कमी होते. यासोबत ओंकार, ध्यानधारणा, प्राणायाम, सात्त्विक आहार-विहार जर ठेवला तर नक्कीच तुमचे बाळ डॉक्टर, इंजिनीअर, संशोधक होईलच. पण त्याही पलीकडे जाऊन जगातील उच्च स्थान प्राप्त करेल.

**गर्भधान संस्कार -** मासिक पाळीच्या दहाव्या दिवसापासून ते अठराव्या दिवसापर्यंत गर्भधान विधी करतात. शुभदिनी सायंकाळी भावी माता-पित्याने स्नान करून कुलदेवतेचे स्मरण करून अपत्यप्राप्तीची इच्छा मनात धरून रात्री

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये बालदिंडीचे आयोजन



आषाढी एकादशीनिमित्त सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलने बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – आषाढी एकादशी म्हणजे वारकरी सांप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव. आषाढी एकादशीनिमित्त लाखोंच्या संख्येने वारकरी, भक्त पंढरपूरमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात. या पार्श्वभूमीवर सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलने बाल दिंडीचे आयोजन करून महाराष्ट्राच्या अध्यात्मिक वैभवाचे संस्कार दर्शविले. या दिंडीमध्ये पूर्व प्राथमिक ते इयत्ता दहावी पर्यंतचे सर्व बाल वारकरी हरिभक्तित तल्लीन झाले.

विठूनामाच्या जयघोषांनी शाळेचा परिसर दुमदुमून गेला होता. दिंडीत शाळेतील विद्यार्थी विठ्ठल–रुक्मिणी, विविध संत तसेच वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत टाळ, वीणा, भगवे ध्वज व तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झाले होते. ढोल पथक, लेझीम पथकासह निघालेली ही दिंडी वाजत गाजत, विठ्ठल नामाचा जयघोष करत तारकपूर परिसरातून फिरून विवेकानंद स्कूलमध्ये आली.

शाळेमध्ये आल्यावर पारंपारिक पद्धतीने औक्षण व आरती झाल्यावर अतिशय भक्तीमय वातावरणात विद्यार्थ्यांनी विठुरायाचा जयघोष केला. त्यानंतर लेझीम, टाळ तसेच झेंडे यांचे पारंपारिक प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. तसेच पूर्व प्राथमिकच्या छोट्या वारकऱ्यांनी विठुरायाच्या गीतांवर ठेका धरला.

तसेच शाळेतील संगीत शिक्षक श्री. पठारे यांनी इतर शिक्षिकांच्या सहकार्याने 'मोबाईल नको ग बाई' या भारुडातून मोबाईलचे तोटे प्रतिपादित केले.

तसेच इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी संत जनाबाईच्या गौऱ्या बोलू लागल्या व संत नामदेवांची खीर या दोन नाटिका सादर करून या संतांची आपल्या लाडक्या विठोबा प्रती असलेली भक्ती दाखवून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीष अहुजा, सौ. करिष्मा नवलानी व भावना ढाले यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान या बालदिंडीत सहभागी झाले होते. त्यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या तसेच दिंडीत सहभागी झालेल्या सर्व बाल वारकऱ्यांचे कौतुक केले.

याप्रसंगी बोलताना शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विठुरायाकडे जनकल्याणाचे साकडे घातले.

मुख्याध्यापिका सौ कांचन पापडेजा यांनी दिंडी सारख्या उपक्रमातून आपला पारंपारिक वारसा प्रत्येकाने जोपासण्याचे आवाहन केले.

हा सोहळा यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


आषाढी एकादशी निमित्त बालिकाश्रम रोड येथे योग दिंडी उत्साहात निघाली.

# चांगल्या आरोग्यासाठी नियमित योगाभ्यास महत्त्वाचा

**मोहनलाल मानधना यांचे प्रतिपादन; आषाढी एकादशी निमित्त बालिकाश्रम रोड येथे योग दिंडी उत्साहात**

नगर – मोबाईल, टीव्ही आणि सोशल मीडियामध्ये भरकटलेल्या लहान मुलांमध्ये अध्यात्माची आवड निर्माण व्हावी तसेच आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी या उद्देशाने श्री राम ावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर यांच्यामार्फत बालिकाश्रम रोड येथे योग दिंडीचे आयोजन केले होते. या दिंडीमध्ये विठ्ठल, रूक्मिणी, संत तसेच वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच दिंडीमध्ये स्केटिंग खेळाडूंनी सुद्धा आपली कला सादर केली. या उपक्रमाचे सर्व पालकांनी कौतुक केले.

मोहनलाल मानधना यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सेंटरचे मुख्य प्रशिक्षक उमेश पाटील, प्रणिता तरोटे, आप्पा लाडाने, स्केटिंगचे प्रशिक्षक सचिन डोंगरे यांच्यासमवेत खेळाडू व पालक उपस्थित होते.

मोहनलाल मानधना म्हणाले की, भारतीय योग प्राणायामाची महती जगभरात पसरली आहे. दरवर्षी आतंरराष्ट्रीय योग दिन साजरा होतो. चांगल्या आरोग्यासाठी योगाभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे. मल्लखांब खेळामुळे शरीराची लवचिकता वाढते. नियमित व्यायामाची तसेच योगा प्राणायामाची सवय लागली तर शरीर व मनही तंदुरुस्त राहते. आषाढी एकादशी निमित्त निघालेली योग दिंडी अतिशय कौतुकास्पद आहे.


महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

# चितांबर विद्यालयात जमला वैष्णवांचा मेळा

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या मूर्ती असलेली सजलेली पालखी, सोबत साक्षात विठ्ठल–रुक्मिणी व संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थी, खांद्यावर झेंडे–पताका आणि डोक्यावर तुळस घेऊन वारकऱ्यांच्या वेशात नटलेल्या बाल वारकऱ्यांनी वातावरण चैतन्यमय बनले होते. ज्ञानोबा–तुकारामाच्या जयघोषात ठेक्यातील पाऊली, गोल रिंगण, फुगड्या आणि टाळ–मृदंगाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला. अनेक शतकांच्या या सांस्कृतिक वारशाची याचि देही याचि डोळा अनुभूती घेताना बाल वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर सात्विक भाव उमटले होते.

जिल्हा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक संतोष कवार त्याचबरोबर तुरुंगाधिकारी विजय सोळंके, अरुण मदने यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून दिंडीची सुरुवात झाली. जिल्हा कारागृहातील कर्मचारी प्रतिभा घोगरे तसेच विद्यालयातील शिक्षक–शिक्षिका आणि विद्यार्थ्यांनी गायलेल्या सुमधुर भजनांमुळे वातावरण भक्तीमय बनले होते. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका मंदा शिंदे, मंजुषा जोशी, गणेश उघडे, सचिन कोटमे, अरुण इघे व सर्व स्टाफने उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. दिंडीची सांगता विद्यार्थ्यांना केळी व लापशीचा प्रसाद वाटून करण्यात आली.

# रेल्वे स्टेशनच्या महानगरपालिका शाळेतर्फे दिंडीद्वारे सामाजिक संदेश



नगर – टाळ–मृदुंगांचा गजर, मुखात विठूनामाचा जयघोष अन् हातात भगवा ध्वज... भजन करीत चाललेले बालवारकरी अन् समवेत विठ्ठल–रुक्मिणीच्या वेशातील विद्यार्थी–विद्यार्थिनी... असे भक्तिमय वातावरणात रेल्वे स्टेशन परिसरात होते. निमित्त होते आषाढी एकादशीनिमित्त मनपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयाने काढलेल्या वृक्षदिंडी आणि ग्रंथदिंडीचे.

या दिंडी मधून विविध सामाजिक संदेश देऊन बालगोपाळांनी जनजागृतीही केली. दिंडीच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धन, मुलगी वाचवा–मुलगी शिकवा, एक पेड माँ के नाम, प्रदूषण टाळा, पाणी वाचवा तसेच शिक्षणाची गरज असे सामाजिक संदेशही देण्यात आले.

तुळशी वृंदावन घेतलेल्या मुली, टाळकरी, बाल वारकरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत टाळ मृदंगाचा निनाद, दिंड्या पताका फडकवीत करण्यात आलेले गोल रिंगण या दिंडीचे आकर्षण ठरले. विठ्ठल–रुक्मिणीसह विविध संतांच्या वेशभूषेत बालवारकरी सहभागी झाले होते.

विठुरायाच्या सजविलेल्या पालखीचे पूजन करून दिंडीस प्रारंभ झाला. शाळेतील सर्व मुला–मुलींनी यावेळी वारकऱ्यांचे पोशाख परिधान केले होते. कोणी विठोबा तर कोणी वासुदेव बनले होते. सकाळी शाळेच्या मैदानावर पालखी सोहळा पार पडताच पंढरपुरच्या वारीप्रमाणेच रिंगणचे देखील इथे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या हातात भगवे झेंडे तर मुलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन हे बघून हे जणू सगळे खरंच पंढरपूरच्या वारीला निघाल्याचा भास होत होता.

एरवी शाळेच्या गणवेशात असलेले विद्यार्थी आज मात्र पांढरा झब्बा, डोक्यावर टोपी, कपाळी गंध, गळ्यात टाळ आणि नऊवारीत आलेल्या मुली केसात गजरा डोक्यावर तुळस आणि विठ्ठल नामाची शाळा भरली या अभंगाप्रमाणे विठ्ठल रखुमाईच्या भक्तीत दंग झालेले अनेक बाल वारकरी आज शाळेत अवतरले. यावेळी ज्ञानाच्या मंदिरात भोळ्या विठ्ठलाच्या हरिनामाचा गजर झाला. अन अवधी शाळा दिंडी सोहळ्याच्या भक्तीरसात तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले.

सर्व शिक्षकांनी जय जय राम कृष्ण हरी, रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी, ज्ञानोबा माऊली तुकाराम या अभंगांचे गायन करून टाळ व वीणा यांच्या तालावर ठेका धरत नृत्य तसेच विठ्ठल फुगडी खेळून प्रत्यक्षात श्रीक्षेत्र पंढरपुरातील भक्तिमय वातावरण रेल्वे स्टेशन परिसरात निर्माण झाले. सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी पारंपारिक वारकरी वेशभूषा, तुळशी व भगवे ध्वज घेऊन अभंगाच्या ठेक्यावर नृत्य व फुगडी चा आनंद घेतला आणि या नयनरम्य सोहळ्यात आपली भक्ती अभिव्यक्त केली.

नाशिक येथील एक अज्ञात उद्योजक यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. रिंगण आटोपल्यावर परिसरातून फेरी काढत विठ्ठल मंदिरात टाळ मृदुंगाच्या गजरात विठुरायाची भजने गात आणि पसायदान म्हणत या सोहळ्याचा शेवट झाला.

दरवर्षी शाळेत दिंडीचे आयोजन केले जाते. या दिंडी द्वारे आम्ही परिसरात विविध सामाजिक संदेश देण्याचाही प्रयत्न करत असतो. यंदाचा हा रिंगण सोहळा आनंददायी ठरला असून सर्व शिक्षक व पालकांच्या सहकार्याने हे शक्य झाल्याचे मुख्याध्यापक विजय घिगे यांनी सांगितले.

हा दिंडी सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक मनिषा शिंदे, भारती कवडे, वर्षा गायकवाड, मनिषा गिरमकर, विठ्ठल आठरे, दिपाली नवले तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य व सर्व पालकांचेही सहकार्य लाभले.


गुलमोहर रोड आनंद विद्यालय शाळेत आषाढ दिंडी वारी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# आनंद विद्यालयात रंगली पंढरीची वारी

नगर – गुलमोहर रोड आनंद विद्यालय शाळेत आषाढ दिंडी वारी कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी छोटी मुले वारकरी वेशभूषेत आली होती. गुलमोहर रोड वर दिंडीची वारी काढण्यात आली व यामध्ये रिंगण करून नृत्य करण्यात आले. परिसरातील लोकांनी यावेळी थांबून विद्यार्थ्यांचे हे कार्यक्रम पाहिले. आनंदनगर परिसरातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेतला. यावेळी लापशीचा गोड प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव किसन तरटे, ज्येष्ठ संचालक शरदकुमार झंवर, ज्येष्ठ संचालक विश्वनाथ पोखरकर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रविंद्र अष्टेकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर आदीसह शिक्षक पालक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयामधील डॉक्टर विद्यार्थ्यांनी केली वारकऱ्यांची आरोग्यसेवा


अहिल्यानगरच्या गुणे आयुर्वेद महाविद्यालयातील डॉक्टर विद्यार्थ्यांनी संस्थेचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरला जाणाऱ्या विविध छोट्या मोठ्या दिंड्यांमधील वारकऱ्यांवर औषधोपचार करून आरोग्यसेवा केली

नगर – पंढरपूरला जाणाऱ्या विविध छोट्या मोठ्या दिंड्यांमधील वारकऱ्यांवर औषधोपचार करून आरोग्यसेवा करण्याचा उपक्रम गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयातील प्रशिक्षित डॉक्टर विद्यार्थ्यांनी केली. यासाठी सोलापूर रोडवरील, दहिगाव साकत, बनपिंपरी येथे विशेष बूथ लाऊन वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार करण्याचा उपक्रम राबवला.

आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप व महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य दत्तात्रय लोडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या गेलेल्या. या उपक्रमात वैद्य ए.पी. जगदाळे, वैद्य ए. एच. शिंगारे, वैद्य एन.सी. जाधव, वैद्य व्ही.के. वाघ, वैद्य जी. व्ही. लोखंडे, वैद्य एस. बी. कदम, वैद्य व्ही. पी. पवार, वैद्य एस. आर. मुद्गल, वैद्य समीर होळकर, वैद्य ए.टी.देशमुख, वैद्य ए. ए. देशमुख, वैद्य नीलकंठ ठाकरे, वैद्य टी. एस. वानखेडे व वैद्य रूपाली म्हसे यांच्यासह तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या शिबिरात वारकऱ्यांच्या पायावर तीळ तेलाचे स्नेहन करणे तसेच विविध आजारांवर औषधोपचार करण्याची सेवा सहभागींनी दिली.


जय बजरंग विद्यालयमध्ये रंगला आषाढी एकादशी निमित्त विठलाचे पूजन करताना शिक्षक व विद्यार्थी.

# जय बजरंग विद्यालयात रंगला एकादशी निमित्त रिंगण सोहळा

नगर – आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये ५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थी दिंडीचे आयोजन केले होते. यामध्ये बाल वारकरी, तसेच विद्यार्थी वारकरी, पालक, शिक्षक सहभागी झाले होते. या सोहळ्यामध्ये विद्यार्थी वारकरी, टाळकरी, माळकरी, वेशामध्ये उपस्थित झाले होते.

विद्यार्थ्यांनी साधू संतांच्या, महंतांच्या, पंढरीच्या पांडुरंगाच्या, आई रुक्मिणीच्या भूमिका साकारत वेश परिधान केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी व पालकांनी विविध भक्तीगीते गाऊन, अभंग गाऊन, श्री विठ्ठलाच्या नामाचा जयघोष केला. दिंडीचे नियोजन विद्यालयाच्या शिक्षक वृंदांनी केले होते. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगीता पाठक, मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, हभप वाणीभूषण रवींद्र महाराज आव्हाड यांच्या हस्ते विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यालयाचे कलाशिक्षक प्रमोद उबाळे यांच्या माध्यमातून मैदानावरती भव्य दिव्य स्वरूपात साकारलेल्या विठ्ठलाच्या रांगोळी कटआउट भोवती केलेल्या रिंगणामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी गोलाकार रिंगण करून, रिंगणामध्ये अभंगाच्या तालावर फुगड्या खेळण्यात आल्या.

या सोहळ्याला आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर यांनी शुभेच्छा देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

# आषाढी एकादशीनिमित्त आठरे पाटील स्कूलमध्ये चिमुकल्या वारकऱ्यांचा 'दिंडी सोहळा' उत्साहात


आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त चिमुकल्या वारकऱ्यांचा दिंडी सोहळा उत्साहात झाला.

नगर – अहमदनगर शहराच्या सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या विद्यार्थ्यांना पारंपारिक धार्मिक सण, उत्सव अवगत व्हावे व त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. ५ जुलै रोजी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या चिमुकल्या बालगोपाळांनी वारकऱ्यांची वेशभूषा करून, पालखी मिरवणुकीद्वारे विठ्ठल नामाच्या जयघोषात व उत्साही वातावरणात दिंडी सोहळा साजरा केला. आषाढ धारांचे आगमन आणि पंढरीच्या वारीची आस वारकरी, विणेकरी, टाळ, मृदुंगाचा गजर करीत पायी वारी संपूर्ण राज्यातील विठ्ठल भक्तीने न्हाऊन निघाली आहे. अशातच आषाढी एकादशीच्या निमित्ताने आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या बाल वारकऱ्यांनी विठ्ठल नामाची शाळा भरवली होती. वारीचा आनंद घेण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी काढून हा सोहळा उत्साहात साजरा केला. शाळेतील सर्व विद्यार्थी हातात भगव्या पताका व टाळ घेऊन विठ्ठल नामाचा जयघोष करत होते.

वाद्यवृंदाचा निनाद, अभंगाचे गायन करत व विठू माऊलींच्या नामस्मरणात हा दिंडी सोहळा शाळेच्या प्रवेशद्वारातून प्रस्थान करत, मुख्य इमारतीला प्रदक्षिणा घालत शाळेच्या प्रांगणात अवतरला, जणू अवघे पंढरपूरच अवतरल्याची अनुभूती येत होती.

विठ्ठल–रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी या दिंडी सोहळ्याचे आकर्षण ठरले. चिमुकल्यांनी वारकऱ्यांचा पोशाख परिधान करून कपाळी बुक्का, गळ्यात टाळ आणि नऊवारीत असलेल्या मुलींनी डोक्यावर तुळस घेऊन विठ्ठल नामाचा गजर करत सुंदर असे रिंगण करून दिंडी सोहळ्याचे आकर्षण वाढवले. शाळेतील विद्यार्थी – शिक्षक यांनी विठ्ठल नामाच्या गजरात छान असे नृत्य करुन, सुंदर असे विठ्ठल रखुमाईचे गीत सादर केले. तसेच विद्यार्थी – शिक्षकांनी फुगडी खेळण्याचा आनंद लुटला.

दिर्डीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली अनिल आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त यांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, समन्वयक आणि पर्यवेक्षिका यांनी दिंडी सोहळ्यातील विद्यार्थ्यांचे स्वागत करुन मार्गदर्शन केले.

हा चिमुकल्यांचा दिंडी सोहळा यशस्वीतेसाठी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक वर्गाचे सर्व वर्गशिक्षक व शिक्षकवृंद–शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. विद्याते धनश्री यांनी केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



आषाढी एकादशी निमित्त अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ व शिशुविहार बालवाडीच्या संयुक्त विद्यमाने बाल वारकऱ्यांची दिंडी काढून श्री विठ्ठल रुक्मिणी देवतांची महाआरती करण्यात आली

## जिल्हा ब्राह्मण संघ व शिशुविहार बालवाडीच्यावतीने दिंडी व महाआरती

नगर – आषाढी एकादशी निमित्त अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ व शिशुविहार बालवाडीच्या संयुक्त विद्यमाने दिंडी व रिंगण सोहळा तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी देवतांची महाआरती करण्यात आली. चिमुकल्या वारकऱ्यांची दिंडी काढण्यात आली. यात विद्यार्थी पांडूरंग, रुक्मिणी व वारकऱ्यांच्या वेशभूषेत उत्साहात सहभागी झाले होते. या दिंडीचे कोर्ट गल्लीतील सुयोग मंगल कार्यालयात जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.

यावेळी उपस्थित वेदमुर्तींनी पुरुषसूक्त म्हणून पांडुरंगाची पूजा केली. यावेळी विठ्ठल रुक्मिणी देवतांची आरती करण्यात आली. उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष किशोर जोशी यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले.

यावेळी उद्योजक राजकुमार जोशी, सुनिल रामदासी, स्नेहा जोशी, आमोल कापरे, दिनेश जोशी, प्रसाद कुलकर्णी, रोहिणी पुंडलींक, श्रीकांत जोशी, ओमकार मुळे, घनपाठी वेदमूर्ती, सागर कुलकर्णी, घनपाठी प्रतिक मुळे, मयुर जोशी, सुमित कुलकर्णी, विभव निसरगंड, तुषार तांबोळी, श्री.गोंगले, शिशुविहार बालवाडीच्या संचालिका श्रीमती देव आदींसह नागरिक उपस्थित होते.

# नृत्यांगणांच्या भरतनाट्यमच्या भावाभिनयातून विठ्ठल भक्तीच्या सादरीकरणाने भाविक मंत्रमुग्ध

नगर – नृत्यसाधक संस्थेच्या विद्यार्थिनींनी 'अभंगनृत्य' ही अनोखी नृत्यसेवा विठ्ठलाच्या चरणी अर्पण केली. आषाढी एकादशी निमित्त झालेल्या या अभिनव उपक्रमात नृत्यांगणांनी भरतनाट्यमच्या भावाभिनयातून विविध संतांचे जीवन व विठ्ठल भक्तीचे केलेल्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.



अभंगनृत्य कार्यक्रमात नृत्यसाधक संस्थेच्या विद्यार्थिनींनी विविध संतांच्या अभंगांवर नृत्याविष्कार करत नृत्यसेवा विठ्ठलाच्या चरणी अर्पण केली.

### आषाढी एकादशी निमित्त नृत्यसाधक संस्थेचा अभिनव उपक्रम

गुलमोहर रोड वरील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात झालेल्या जाऊ संतांची या गावा या कार्यक्रमात विविध संतांच्या अभंगामधील भक्तीभाव नृत्यांगणांनी आपल्या नृत्याविष्कारातून सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये अहिल्यानगर मधील नृत्यसाज अ‍ॅकॅडमी, राधिका डान्स अ‍ॅकॅडमी व नृत्यदर्पण डान्स अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. आषाढी एकादशी निमित्त मंदिरात आलेला प्रत्येक भाविक हा अनोखा नृत्याविष्कार पाहण्यासाठी थांबत होता. यावेळी उत्कृष्ट सादरीकरणाने अनेक नृत्यांना वन्समोअर मिळाले.

या कार्यकमात चल ग सखे पंढरीला, तुम्ही संत मायबाप, ओम नमोजी आद्य, खेळ मांडियेला वाळवंटी, वेढा वेढा पंढरी, तुझे रूप चित्ती राहो, कानडा राजा पंढरीचा, अबीर गुलाल उधळीत, नामदेव किर्तन करी, संत जनाबाई, येई हो विठ्ठले, अवघा रंग एक झाला व माऊली माऊली या अभंगांवर सादरीकरण झाले. तुझे रूप चित्ती राहो या अभंगात संत गोरा कुंभार यांच्याप्रमाणे तान्हे बाळ तुडवण्याचा चित्तथरारक प्रसंग अगदी हुबेहूब विद्यार्थिनींनी सदर करून उपस्थितांचा मनाचा ठाव घेतला.

सहभागी सर्व नृत्यांगनांना नृत्यसाज अ‍ॅकॅडमीच्या संचालिका आश्लेषा पोतदार, राधिका डान्स अ‍ॅकॅडमीच्या संचालिका कविता भांबरे व नृत्यदर्पण डान्स अ‍ॅकॅडमीच्या संचालिका अपर्णा थट्टे यांनी मार्गदर्शन केले होते.

कार्यकमासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विश्वस्तांनी सहकार्य केल्याबद्दल अश्विनी भावे यांनी आभार मानले. यावेळी शितल देशमुख, आणि सुजाता कुलकर्णी व भाविक उपस्थित होते.

# बाल वारकऱ्यांच्या दिंडीने श्रमिकनगर परिसर दणाणला

### श्री मार्कंडेय विद्यालयाच्या दिंडीने वेधले लक्ष; विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा रंगला रिंगण सोहळा; दिंडीतून पर्यावरण संवर्धन व मुलगी वाचवा... मुलगी शिकवाचा संदेश

नगर – श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त उत्साहात सावेडी उपनगरातून दिंडी काढून पर्यावरण संवर्धनाचा व मुलगी वाचवा... मुलगी शिकवाचा संदेश दिला. विठ्ठल विठ्ठल...विठ्ठला हरी ओम विठ्ठला..., ज्ञानबा तुकाराम..., विठ्ठल माझा माझा... मी विठ्ठलाचा..., माऊली...माऊली... या भक्तीगीतांमध्ये तल्लीन होऊन विठ्ठल नामाच्या जय घोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात, लेझिम व ढोल पथकासह दिंडी सोहळा रंगला होता.



श्री मार्कंडेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त उत्साहात सावेडी उपनगरातून दिंडी काढून पर्यावरण संवर्धनाचा व मुलगी वाचवा... मुलगी शिकवाचा संदेश दिला.

प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, विश्वस्त राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, शंकर येमुल, श्रमिक जनता हाऊसिंग सोसायटीचे चेअरमन विलास सगम, माजी नगरसेवक मनोज दुलम यांच्या हस्ते दिंडीतील पालखीचे पूजन करुन या सोहळ्याला प्रारंभ झाले. यावेळी सचिव प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे, माध्यमिकचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे आदींसह सर्व शालेय शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दिंडीच्या अग्रभागी असलेल्या पालखी समोर विद्यार्थ्यांनी लेझिमचे डाव सादर केले. दिंडीच्या कार्यक्रमानिमित्त शालेय विद्यार्थिनी समिक्षा मुत्त्याल, श्रेजल कल्याण, पायल खेत्रे, अनुष्का रामगिरी यांनी शिक्षिका सुचिता भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल-रुक्मिणीची भव्य रांगोळी साकारली होती. दिंडीत विद्यार्थी वारकरींच्या वेशभूषेत तर विद्यार्थिनी डोक्यावर तुलस वृंदावन घेऊन सहभागी झाल्या होत्या. भगवे ध्वज, टाळ, मृदूंग व वीणा हातात घेऊन बाल वारकऱ्यांनी केलेल्या विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, जिजाऊ, श्रीकृष्ण, मीराबाई, मुक्ताबाई व संत तुकारामांच्या वेशभूषा परिधान केलेले लहान विद्यार्थी दिंडीचे आकर्षण ठरले.

श्रमिकनगरच्या बालाजी मंदिर समोर रिंगण सोहळ्यांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. यावेळी विद्यार्थिनी व शिक्षिकांनी फुगड्यांचा फेर धरला होता. दिंडीतील पालखीचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले. लहान मुलांची दिंडी पहाण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. भिस्तबाग चौक, वैदूवाडी येथून मार्गक्रमण करत शाळेच्या आवारात दिंडीचा समारोप झाला. दिंडी यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षिका भारती गाडेकर, अनिता आडेप, उमा सिद्दम आदींसह शिक्षक आदींनी परिश्रम घेतले.



अरणगावच्या माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्ताने भजन सोहळा उत्साहात पार पडला.

# अरणगावच्या माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त रंगला भजनसोहळा

नगर – माऊंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड, अरणगाव, अ.नगर येथे आषाढी एकादशी निमित्ताने भजन सोहळा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात सहभागी होत, विठ्ठल-रुखमाईच्या नामस्मरणात संपूर्ण शाळा भक्तिरसात न्हालेली दिसली.

कार्यक्रमात मुलांनी व मुलींनी वेगवेगळी भजने व वारीची माहिती सादर केली. वाद्यवृंदाच्या साथीने प्रस्तुत केलेल्या भजनांनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.

विरम कोठारी यांनी आपल्या भाषणात वारीचे महत्व विशद करत विद्यार्थ्यांनीही अभ्यासाची वारी मेहनतीने पार पाडावी असा संदेश दिला.

बालवयातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल भक्तीवरील कथा, भजने आणि वारीचे शैक्षणिक महत्त्व सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

शाळेच्या प्राचार्या प्रा. शैलजा लोटके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना वारीतून मिळणाऱ्या आध्यात्मिक समाधान, पंढरपूर दिंडीचे महत्त्व, आणि सामूहिकतेचे मूल्य याबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.



## माळीवाडा येथील विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महापूजा

आषाढी एकादशीनिमित्त माळीवाडा येथील शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर परिसरातील श्री संत सावता महाराज विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महापूजा झाली. याप्रसंगी कॉन्ट्रॅक्टर ज्ञानदेव थोरात, देवस्थाचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे, रंगनाथ फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, प्रा.माणिकराव विधाते, संजय चाफे, नितीन पुंड आदि उपस्थित होते.

# ज्ञानसाधना गुरुकुलच्या बाल वारकऱ्यांच्या दिंडीची केडगाव देवीला प्रदक्षिणा

### एक हजार बाल वारकऱ्यांचा सहभाग

नगर – केडगाव येथील ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी उत्साहात काढण्यात आली. या दिंडीत एक हजार बाल वारकऱ्यांनी सहभाग नोंदवला. बाल वारकऱ्यांचा केडगाव देवी येथे रिंगण सोहळा पार पडला. यावेळी चिमुकल्यांनी देवीला प्रदक्षिणा घातली. या पायी दिंडीतील विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल रुख्मिणी, संत तुकाराम महाराज, मीराबाई, मुक्ताबाई यांची वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधले. तर सर्व विद्यार्थी वारकऱ्यांच्या पोशाखात दिंडीत सहभागी झाले होते. दिंडीने केडगाव म्हणजे प्रती पंढरपूरचा भास निर्माण झाला होता. केडगाव देवी मंदिरासमोर माजी नगरसेवक मनोज कोतकर व परिसरातील नागरिकांनी दिंडीचे स्वागत केले.



केडगाव येथील ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी काढण्यात आली.

पायी दिंडीसाठी जगदंबा तरुण मंडळ, शिवमुद्रा ग्रुप, साई सेवा महिला मंडळ, मनोज कोतकर मित्र मंडळ, केडगाव बास्केट बॉल क्लब, बच्चन कोतकर, अनिल ठुबे, अजित कोतकर, संचालक भैरू कोतकर, दत्तात्रय चेमटे, जगन्नाथ चेमटे, अमित ढोरसकर, छबुराव कोतकर, मेजर राजाराम कोतकर, अमोल कोतकर, गणेश पोंदे, संदीप काळे, राहुल पटवा, आदिनाथ घाटविसावे, मेजर रवींद्र टकले, तुषार कोतकर, ऋषिकेश कोतकर, अर्चना गारुडकर, इंदुबाई रायकर, ओम बनकर यांनी मुलांना फराळाचे वाटप करुन पाण्याची व्यवस्था केली होती. तसेच महेश कोतकर, शिवाजी बोरुडे, भाऊ कोतकर, अनिल ठुबे, रामदास ढवळे, भैरू कोतकर, शैलेश सुंबे, साई सेवा मंडळ व साई सेवा महिला मंडळ यांनी पूजा करून दिंडीचे स्वागत केले.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक संदीप भोर, लंडन किड्स प्री स्कूलच्या प्राचार्या रुचिता जमदाडे, नितीन ठुबे, गुलाब कोतकर, किरण खांदवे, स्वप्नील परांडे, रणजित ठुबे, विलास गारुडकर, सचिन भस्मे, निलेश चेमटे, शिक्षक शाहरुख शेख, शबाना शेख, प्रतिक्षा फुलारी, जोसना सातपुते, सुवर्णा दाणी, गीता रणखांब, प्रतिभा साबळे, जयश्री साठे, संचालक प्रा. प्रसाद जमदाडे, संजय कोतकर, गणेश कोतकर आदींसह सर्व सहकारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# विठोबा माऊली...ज्ञानराज माऊली तुकाराम...जयघोषात रंगला दिंडी सोहळा

### रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयाच्या शालेय वारकऱ्यांचा पायी दिंडी सोहळा

नगर – नागपूर येथे रेणूका शिक्षण प्रसारक मंडळाच्या रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयाचा आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.



रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयाच्या शालेय वारकऱ्यांचा पायी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी झालेले शिक्षक.

दिंडीत श्री विठ्ठल रुख्मिणी, ज्ञानेश्वर माऊली यांच्या वेशभूषेत असलेल्या दिंडीतील चिमुकल्यांनी परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या जय घोषात, पारंपरिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत हातात भगवे ध्वज घेतलेले विद्यार्थी दिंडीत सहभागी झाले होते. या दिंडीचे मुख्य आकर्षण ठरले ते बाल वारकऱ्यांचा रिंगण सोहळा, या रिंगण सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधले. शाळेपासून माताजीनगर मार्गे एम ब्लॉक तसेच संभाजीनगरमधून पुन्हा शाळेपर्यंत पायी दिंडी काढण्यात आली. दिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणारे फलक हातात घेतले होते. दिंडीत विद्यार्थ्यांसह पालक देखील सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना आपल्या महाराष्ट्राची परंपरा असलेल्या वारकरी संप्रदायची माहिती सांगण्यात आली. माताजीनगर मधील नागरिक तसेच पालकांकडून दिंडीतील बाल वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

दिंडीचे प्रारंभ श्री विठ्ठल रुख्मिणी मूर्तिचे पूजन करून करण्यात आले. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून पालखीची पूजा केली.

कार्यक्रमासाठी संस्थचे पदाधिकारी, मुख्याध्यापक शिवाजीराव घाडगे, पर्यवेक्षक दत्तात्रय दरेकर, नंदा दुधाने, संतोष उरमुडे, केशव गुंजाळ, जगदीश आव्हाड, राजेंद्र शिंदे, कैलास उमाप, राजकुमार इटेवाड, सुनंदा शिरसाठ, उल्का गवते, नितीन घाडगे, दीपक कळसे, राजू नरोडे, नितीन शिंदे, अभिषेक सांगळे, म्हस्के आदींसह पालक व नागरिक उपस्थित होते.

# गुरुकुल कॅम्पसमध्ये बालदिंडीचे आयोजन

नगर – तपोवनरोड येथील एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल व महाराष्ट्र कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांच्या बालदिंडीचे आयोजन करण्यात आले. सदर दिंडीत सकाळीच ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तीमय वातावरणात डोळे दिपून टाकणारा अश्वरिंगण सोहळा पार पडला. माऊलीच्या गजरात पालखीभोवती धावलेल्या अश्वाने डोळ्यांचे पारणे फेडले.



विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बालदिंडीप्रसंगी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारली तसेच सर्व विद्यार्थ्यांनी वारकरी बनून दिंडीची शोभा वाढवली.

सदर दिंडीचा शुभारंभ माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, सदस्य देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शुभम टेमकर, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल च्या प्राचार्या दीप्ती कराळे, पालकवर्ग यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी पालक वर्ग तसेच परिसरातील नागरिक दिंडीमध्ये सहभागी झाले. गजराजनगर मित्र मंडळातर्फे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. छोटू परदेशी, गोपाल परदेशी, सागर मेटटू, शिवम परदेशी, मेजर संदीप परदेशी, राहुल कोल्हे, रोहन परदेशी, गौरव परदेशी, रितेश परदेशी आदी उपस्थित होते.



ग्रीन स्पार्क स्कूलच्या चिमुकल्यांनी दिंडीतून संत परंपरेचा जागर केला.

# ग्रीन स्पार्क स्कूलच्या चिमुकल्यांनी केला दिंडीतून संत परंपरेचा जागर

### टाळ-मृदुंगाच्या गजरात विठू नामाचा जयघोष; बाल वारकऱ्यांनी वेधले लक्ष

नगर – महाराष्ट्राच्या संत परंपरेचा जागर करुन ग्रीन स्पार्क स्कूलची आषाढी एकादशीनिमित्त दिंडी रंगली. दिंडीत श्री विठ्ठल रुख्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, सोपानदेव, नामदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांच्या वेशभूषेत असलेल्या दिंडीतील चिमुकल्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधले. बाल वारकऱ्यांच्या दिंडीने विठूरायाचा गजर केला.

शाळेच्या संस्थापिका प्रा. हेमलता पाटील व शिक्षिका वैशाली वायभासे यांच्या मार्गदर्शनाखाली सारसनगर भागातून ही दिंडी काढण्यात आली होती. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या जय घोषात, पारंपरिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थी दिंडीत सहभागी झाले होते. दिंडीत विद्यार्थ्यांसह पालकांचा देखील उत्साह दिसून आला.

दीपक जाजू व रती जाजू यांनी बाल दिंडीचे स्वागत करुन बाल वारकऱ्यांना खाऊचे वाटप केले. विठ्ठलाची वेशभूषा साकारलेल्या देवांश गाडळकर याने वारकरी सांप्रदायाने बंधूभाव व समानतेची शिकवण दिली असून, सर्व जाती-धर्माला बरोबर घेऊन चालण्याचा संदेश दिला.

सिया कासार हिने रखुमाईची भूमिका साकारली तर राजनंदिनी जाजू, केशवी पवार, सेजल गायकवाड, हर्षित महाजन, साई रत्नाटे, शिवेंद्र बोरकर या मुलांनी बाल संतांची रूपे साकारली होती.




# मस्त दही रवा सँडविच

झटपट रेसिपी

मित्रांनो, नाश्त्याचा प्रश्न आपल्यापुढे आ वासून उभा असतो. तेच ते पदार्थ खाऊन कंटाळा आलेला असतो. अशा वेळी तुम्ही दही रवा सँडविच बनवू शकता.

**सामग्री:** ६ ब्रेड स्लाईस, एक कप रवा, एक कप दही, दोन हिरव्या मिरच्या, एक चमचा आल्याची पेस्ट, चिरलेली कोथिंबिर, तेल आणि चवीनुसार मीठ


**कृती:** हिरव्या मिरच्या बारीक चिरून घ्या. एका भांड्यात दही घेऊन त्यात रवा घाला. हे मिश्रण एकजीव करून दहा मिनिटं झाकून ठेवा. यानंतर त्यात हिरव्या मिरच्या, कोथिंबिर, आल्याची पेस्ट आणि मीठ घाला. प्रत्येक ब्रेड स्लाईसचे दोन त्रिकोणी काप करा. प्रत्येक त्रिकोणी तुकड्याच्या दोन्ही बाजूंना दही आणि रव्याचं मिश्रण लावून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. आता दही रव्याचं मिश्रण लावलेले ब्रेड सोनेरी रंगावर दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.



# रात्री अभ्यास करताय?

स्टडी टिप्स

सकाळी लवकर उठून अभ्यास करणे सगळ्यांनाच शक्य होत नाही. काही विद्यार्थ्यांना सकाळी जाग येत नाही तर काहीजणांना शाळा, कॉलेज, ट्युशन किंवा इतर जबाबदाऱ्या सांभाळताना सकाळची वेळ पाळता येत नाही. अशा वेळी रात्रीचा अभ्यास हा एक चांगला पर्याय ठरतो. रात्री वातावरण शांत



असते तसेच फोनचे आणि बाहेरचे व्यत्यय कमी असतात. त्यामुळे मेंदू अधिक एकाग्र राहतो आणि अभ्यासाची गुणवत्ता सुधारते. मात्र रात्री अभ्यास करताना काही महत्त्वाच्या टिप्स लक्षात घेतल्या, तर त्या अधिक फायदेशीर ठरतात.

**✽ चांगली झोप**

दिवसभराची झोप पूर्ण झाल्याशिवाय रात्री अभ्यास करणे कठीण ठरते. काही कारणाने झोप कमी झाली तर थकवा आणि डोळ्यांवर ताण येतो आणि एकाग्रता साधता येत नाही. त्यामुळे रात्री अभ्यास करायचा असेल तर दिवसा ६-७ तासांची शांत झोप घेणे अत्यावश्यक आहे. झोप पूर्ण झाल्यास मेंदू अधिक ताजातवाना राहतो आणि अभ्यास करत राहण्याची क्षमता वाढते.

**✽ कॉफी**

रात्री अभ्यास करताना झोप येते. अशावेळी कॉफी किंवा ग्रीन टीसारखे पेय मेंदूला सतर्क ठेवतात. विशेषतः कॅफेनमुळे मेंदू सतत ॲक्टिव्ह राहतो आणि झोप दूर राहते. मात्र कॉफीचा अतिरेक टाळा. दिवसभरात १-२ कप कॉफी पुरेशी आहे. जास्त कॅफेनमुळे झोपेचे चक्र बिघडू शकते.

**✽ प्रकाश**

अनेक वेळा विद्यार्थी फक्त टेबल लॅम्प लावतात आणि इतर खोली अंधारात ठेवतात. यामुळे झोप येण्याची शक्यता वाढते. अंधार झोपेस प्रोत्साहन देतो. त्यामुळे संपूर्ण खोलीमध्ये सौम्य पण समप्रकाश असावा. अभ्यास करताना डोळ्यांवर ताण येऊ नये यासाठी प्रकाश थेट पुस्तकावर पडणे आवश्यक आहे. डोळ्यांची काळजी घेतली, तर अभ्यास अधिक वेळ करता येतो.

**✽ बिछान्यावर अभ्यास करू नये**

बिछान्यावर किंवा गादीवर बसून अभ्यास करणे टाळा. यामुळे शरीर रिलॅक्स मोडमध्ये जाते आणि झोप येते. त्याऐवजी खुर्चीवर बसून, पाठ सरळ ठेवून अभ्यास करा. दर काही वेळाने थोडे चालणे, स्ट्रेचिंग करणे यामुळे रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू अधिक ॲक्टिव्ह राहतो. अशा सवयी मेंदूची कार्यक्षमता वाढवतात आणि अभ्यासात सातत्य ठेवता येते.

# दिवसाला ४० हजाराचे उत्पन्न!

अचिव्हर



केरळमधील लीना आणि जितू ही आई-मुलाची जोडी मशरूम शेतीतील यशामुळे चर्चेत आली आहे. त्यांच्या यशाचा मंत्र म्हणजे सातत्य, जिद्द आणि अथक मेहनत. प्रामाणिक प्रयत्न असतील आणि कामाविषयी उत्कटता असेल तर यश मिळणे निश्चित असते.

लीना थॉमस आणि जितू थॉमस यांनी हा व्यवसाय एक छोटा छंद म्हणून सुरू केला होता. मात्र काळानुरूप त्याचा विस्तार केला आणि तो एक नफा देणाऱ्या व्यवसायात रूपांतरित झाला. हा प्रवास जितूने त्याच्या आईबरोबर फार साध्या पद्धतीने एका मशरूम बेडपासून सुरू केला. छंद म्हणून सुरू झालेला उपक्रम लवकरच अर्धवेळ व्यवसायात बदलला. अनेक प्रयोग, चुकांमधून शिकत त्यांनी यामध्ये नवनवीन कौशल्ये आत्मसात केली. त्यानंतर त्यांनी उच्च-घनतेची मशरूम शेती आणि 'स्पॉन लॅब' स्थापन केली. त्यामुळे अर्धवेळ व्यवसायाचे रूपांतर पूर्णवेळ यशस्वी उद्योगात झाले.

पिरावोम येथे असलेले 'लीनाज मशरूम फार्म' तब्बल पाच हजार चौरस फुटांवर पसरले आहे. या फार्ममध्ये जवळपास वीस हजार मशरूम बेड्स असून महिन्याला चार टन ताजे मशरूम उत्पादन होते. येथे १५ कामगार कार्यरत आहेत. त्यात ऐंशी टक्के महिला कर्मचारी आहेत. मशरूम शेतीसाठी तीस अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान आवश्यक असते. या गरजेनुसार फार्मची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे एका मर्यादित जागेत अधिक बेड ठेवणे शक्य झाले आहे.

मशरूम पीक अत्यंत नाजूक असते. तापमानातील लहानश्या बदलामुळे किंवा कीटकांमुळे संपूर्ण पीक नष्ट होऊ शकते. यासाठी लीना आणि जितू सातत्याने मशरूमची काळजी घेतात आणि उच्च गुणवत्तेचे पालन करतात. या व्यवसायातून लीना आणि जितू रोज सरासरी ४० हजार रुपये कमवतात. मशरूम थेट किरकोळ विक्रेत्यांना विकले जात असल्याने कोणताही मध्यस्थ नसतो आणि चांगला नफा मिळतो. ताज्या मशरूम व्यतिरिक्त लीना आणि जितू मशरूम स्टार्टर किट्स, स्पॉन, ग्रो रूम, बेड आणि शेतीसंबंधी मार्गदर्शन सेवाही देतात. येथे शेतकऱ्यांना मशरूम शेतीबद्दल मार्गदर्शन केले जाते. लीना आणि जितू यांची कहाणी नव्या पिढीला शेतीमध्ये करिअर घडवण्याची प्रेरणा देते. या मायलेकाच्या कष्टातून कल्पकतेच्या साह्याने शेतीला आधुनिकतेची जोड देत साध्या छंदाला यशस्वी व्यवसायात कसे रूपांतरित करता येते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.


# करिअर 'क्लाउड कॉम्प्युटिंग'मधलं

वेगळ्या वाटा

'क्लाउड कॉम्प्युटिंग'च्या क्षेत्रात सध्या बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. सध्याच्या काळात बऱ्याच कंपन्या कॉम्प्युटिंगला पब्लिक क्लाउडवर आणत आहेत. 'क्लाउड कॉम्प्युटिंग' ही एक प्रणाली आहे. यात सव्हर्स, स्टोरेज, डेटाबेस, नेटवर्किंग, सॉफ्टवेअर, ॲनालिटिक्स आणि इंटेलिजन्ससारख्या सेवा इंटरनेटच्या माध्यमातून दिल्या जातात. 'गुगल क्लाउड', 'ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस' आणि 'मायक्रोसॉफ्ट एज्योर' या क्लाउड कॉम्प्युटिंग क्षेत्रातल्या मोठ्या कंपन्या आहेत. खाजगी क्लाउड्सही आपल्या सेवा देत आहेत. त्यांचाही बराच वापर केला जातो. 'एचपी' आणि 'आयबीएम'सारख्या जुन्या आयटी इन्फ्रास्ट्रक्चरसोबतच 'न्यूटॅनिक्स'सारखे नवे गडीही सेवा देत आहेत.

म्हणूनच आजच्या काळात 'क्लाउड कॉम्प्युटिंग' हे अपस्किलिंगसाठी अत्यंत योग्य असं तंत्रज्ञान मानलं जातं. आयटी क्षेत्रात सध्या 'क्लाउड सोल्यूशन आर्किटेक्ट्सना सर्वाधिक वेतन दिलं जातं.

इंजिनिअरींग क्षेत्राशी संबंधित विद्यार्थी क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये करिअर करू शकतात. यासोबतच 'जावा लँग्वेज' वर प्रभुत्व असणाऱ्यांसाठीही हे क्षेत्र खुलं आहे. क्लाउड कॉम्प्युटिंगच्या क्षेत्रात 'लॉजिकल रिजनिंग'चं ज्ञान उपयोगी पडेल.




क्लाउड कॉम्प्युटिंगचं ज्ञान मिळवण्याआधी विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रोग्रामिंग शिकावं लागेल.

क्लाउड कॉम्प्युटिंगचे ऑनलाईन अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. यासोबतच 'गुगल क्लाउड', 'एज्योर' आणि 'एडब्ल्यूएस'सारख्या व्यासपीठांकडूनही तुम्ही प्रमाणपत्रं मिळवू शकता.

# कधी करायचा योगा?

फिटनेस फंडा



योगामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य उत्तम रहातं. अधिकाधिक लाभ मिळवण्यासाठी योगा ठराविक वेळी करायला हवा, असं काहींचं म्हणणं आहे. मात्र योगाची नेमकी वेळ कोणती, ठराविक वेळी योग केल्यानेच लाभ होतात का, याबाबत जाणून घेऊ.

योगासनं सकाळच्या वेळी करायला हवीत, असं काही तज्ज्ञ सांगतात. पण ही बाब प्रत्येकाला लागू पडतेच असं नाही. काहीजण रात्री जागतात. त्यांना सकाळी उठणं शक्य नसतं. अशावेळी संध्याकाळीही योगा करता येतो. मुळात योगासनांची योग्य अशी वेळ नसतेच. प्रत्येकाने जीवनशैलीनुसार योगाची वेळ ठरवावी. प्रत्येक वेळेचे लाभ आणि दुष्परिणाम आहेत.


सकाळच्या वेळात योगा केल्याने दिवसाची चांगली सुरूवात होते. चयापचय क्रिया सुधारते, रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहातं आणि दिवसभर पचनसंस्थेचं कार्य उत्तम पद्धतीने सुरू रहातं.

सकाळच्या योगामुळे तुमचा मूड चांगला रहातो. उत्साह टिकतो. मनही शांत रहातं. सकाळी योगा केल्याने आपण स्वत:शी जोडले जातो. दुसरीकडे सकाळच्या वेळात आपले स्नायू, हाडं, सांधे ताठर असल्यामुळे आसनं करायला त्रास होऊ शकतो.

संध्याकाळी योगा करताना आपण निवांत असतो. शरीराही मोकळं झालेलं असतं. अशावेळी कठीण आसनंही करता येतात. अनेकांना सकाळपेक्षा संध्याकाळी जास्त उत्साही वाटतं. संध्याकाळी योगा केल्याने अन्नपचन होतं. रात्री शांत झोप लागते. मात्र तीव्र स्वरुपाच्या योगामुळे झोपेत अडथळे येऊ शकतात. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या सोयीनुसार योगा करावा.

# नातं पुढे सुरू ठेवावं का?

मॅच मेकिंग



गेल्या तीन वर्षांपासून मी एका मुलाच्या प्रेमात आहे. आम्हाला लग्नही करायचं आहे. पण त्याचं कुटुंब खूप जुनाट विचारांचं आहे. त्याने प्रामाणिकपणे मला हे सगळं सांगितलं. त्यांच्या आदर्श सुनेच्या काही कल्पना आहेत. लग्नानंतर मला पारंपरिक वेशातच रहावं लागेल. शिक्षिकेची नोकरी पत्करून घराकडे जास्त लक्ष द्यावं लागेल. घरातली सगळी कामं सुनेनेच करावी अशी त्यांची अपेक्षा आहे. माझं या मुलावर खूप प्रेम आहे. पण मला माझं बँकिंगमधलं बहरणारं करिअर सोडायचं नाही. मी त्यांचा आदर करते. पण यासाठी मी माझी जीवनशैली बदलू शकत नाही. अशा परिस्थितीत मी या मुलाशी लग्न करावं का? मला तो आवडतो. त्याच्याशी ब्रेक अप झाल्यामुळे मला खूप वाईट वाटेल. मी काय करू?

– तुला वाटणारी काळजी अगदी स्वाभाविक आहे. करिअर, भविष्य पणाला लावता येणार नाही. तुझी ध्येयं, उद्दिष्टं स्पष्ट असतील तर याविषयी प्रियकराशी बोल. यातून सुवर्णमध्य काढणं शक्य असेल तरच हे नातं पुढे नेण्यात अर्थ आहे. तसं होणार नसेल तर हे सगळं इथेच थांबवलेलं बरं.

ॲप वर्ल्ड

## व्हॉट्सॲपचे नवे फीचर





व्हॉट्सॲपचे नवीन 'एआय सम राइज फीचर' ग्रुप चॅट आणि पर्सनल मेसेज दोन्हीसाठी काम करेल. म्हणजे मित्रांचे ग्रुप चॅट असो किंवा ऑफिसमधील महत्त्वाचे मेसेज, आता तुम्हाला प्रत्येक मेसेज न उघडता काय चालले आहे हे कळेल. हे फीचर तुम्हाला अद्याप न वाचलेल्या सर्व मेसेजची झलक देईल. कोणतीही महत्त्वाची माहिती चुकवावी लागणार नाही आणि तुम्ही नेहमीच अपडेट राहाल. व्हॉट्सॲप नेहमीच गोपनीयता धोरणाबद्दल गंभीर असते. या वेळीही कंपनीने युजर्सची वैयक्तिक माहिती पूर्णपणे सुरक्षित असेल, असे स्पष्ट केले आहे. हे नवीन एआय फीचर प्रायव्हेट प्रोसेसिंग नावाच्या तंत्रज्ञानावर काम करते. यात तुमचे संभाषण फक्त तुमच्यासाठीच राहील याची खात्री देण्यात आली आहे. व्हॉट्सॲपच्या मते ही प्रक्रिया 'ट्रस्टेड एक्झिक्युशन एन्व्हायर्नमेंट' (टीईई) नावाच्या सुरक्षित प्लॅटफॉर्मवर होते. त्यामुळे डेटा पूर्णपणे खासगी आणि सुरक्षित राहतो. या नवीन फीचरबद्दल आणखी एक खास गोष्ट म्हणजे ते केवळ संदेशाचा सारांशच देणार नाही, तर कोणते संदेश महत्त्वाचे आहेत आणि कोणते त्वरित वाचण्याची आवश्यकता नाही हेदेखील सुचवेल. याचा अर्थ तुमचा वेळ वाचेल आणि महत्त्वाचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचेल.

टेक टॉक

## व्हॉट्सॲप अकाऊंट दोन फोन्सवर!

तुम्हाला एकाच वेळी दोन वेगवेगळ्या स्मार्टफोनवर एकच व्हॉट्सॲप अकाऊंट वापरायचे असेल तर आता ते शक्य आहे. पूर्वी हे करणे कठीण होते. कारण पूर्वी फक्त एकाच फोनवर व्हॉट्सॲप चालवण्याची परवानगी देत असे. पण आता कंपनीने एक नवीन फीचर आणले आहे. त्यामुळे हे काम खूप सोपे झाले आहे. आता व्हॉट्सॲपच्या मल्टी-डिव्हाइस फीचरमुळे तुम्हाला एकाच वेळी चार डिव्हाइसवर एकच अकाऊंट वापरण्याची परवानगी मिळते आणि यामध्ये दुसऱ्या स्मार्टफोनचा समावेश आहे.




म्हणजेच, आता तुम्हाला फक्त एका फोनपुरते मर्यादित राहण्याची आवश्यकता नाही. दोन फोनवर एक व्हॉट्सॲप अकाउंट वापरण्यासाठी तुम्हाला कोणत्याही हॅक किंवा थर्ड पार्टी ॲपची आवश्यकता नाही. फक्त काही सोप्या स्टेप्स फॉलो करा:




१. दुसऱ्या फोनवर व्हॉट्सॲप इंस्टॉल करा. लक्षात ठेवा, इन्स्टॉल करताना त्यात तुमचा नंबर टाकू नका. २. लिंक टू एक्झिस्टिंग अकाऊंट निवडा हा पर्याय ॲपच्या वेलकम स्क्रीनवर दिसेल, त्यावर टॅप करा. ३. आता त्या फोनच्या स्क्रीनवर एक क्यूआर कोड दिसेल. ४. तुमच्या मुख्य फोनवरून स्कॅन करा. आधीच व्हॉट्सॲप सुरु असलेल्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा. लिंक्ड डिव्हाइसेस पर्यायावर क्लिक करा. आता क्यूआर कोड स्कॅन करा. हे केल्यानंतर, तुमचे व्हॉट्सॲप दोन्ही फोनमध्ये सक्रिय होईल. सर्व चॅट्स, मेसेजेस आणि मीडिया दोन्ही फोनमध्ये सिंक राहतील. क्यूआर कोड पर्याय दिसत नसेल तर तुम्ही व्हॉटस्प वेब पर्यायदेखील वापरून पाहू शकता. याद्वारे तुम्ही दुसऱ्या फोनमधील ब्राउझरद्वारे व्हॉट्सॲपदेखील वापरू शकता. व्हॉट्सॲपचे हे मल्टी-डिव्हाइस वैशिष्ट्य एंड-टू- एंड एन्क्रिप्शनसह येते. याचा अर्थ तुमचे वैयक्तिक चॅटस् आणि कॉल पूर्णपणे सुरक्षित असतील.

जाणून घ्या

## स्विच सुरूच ठेवताय?



फोन चार्जिंगमधून काढल्यानंतर स्विच बंद न करण्याची सवय असेल तर ती ताबडतोब बदला. चार्जर फोनशी कनेक्ट केलेला नसतानाही वीज वापरत राहतो. चार्जरमध्ये वापरलेले सर्किट आणि ट्रान्सफॉर्मर सक्रिय आणि चार्जिंगसाठी तयार राहिल्यामुळे असे घडते. याला स्टँडबाय पॉवर किंवा व्हँपायर पॉवर असेही म्हणतात. व्हँपायर पॉवर म्हणजे सॉकेटमध्ये प्लग केलेले, परंतु वापर नसलेले उपकरण कमी प्रमाणात वीज वापरते. चार्जर, टीव्ही आणि संगणक यासारख्या उपकरणाचा प्लग सॉकेटमध्ये असेल आणि स्विच सुरु असेल, पण तुम्ही ते उपकरण वापरत नसाल तरी वीज वापर वाढू शकतो आणि त्यामुळे वीज बिल वाढू शकते.

# निसर्गाच्या सानिध्यात जा

भटकंती

तुम्हाला रोजच्या धावपळीतून कुठे तरी शांत व कमी गर्दीच्या ठिकाणी जायचे असेल तर तामिळनाडू राज्यात लपलेले रत्न कोटागिरी स्टेशन तुमच्यासाठी एक योग्य ठिकाण असू शकते. जुलैमध्ये येथील हवामान खूप आल्हाददायक असते. तुम्हाला पावसाळ्यात डोंगराळ भागामध्ये फिरायला जायचे असेल आणि तेथील निसर्गाचा आनंद घ्यायचा असेल, तर कोटागिरी हा एक उत्तम पर्याय आहे.

निलगिरी पर्वतरांगांच्या तिसऱ्या सर्वोच्च शिखरावर असलेले कोटागिरी हे समुद्रसपाटीपासून सुमारे एक हजार आठशे मीटर उंचीवर वसलेले आहे. येथून तुम्हाला दऱ्याखोऱ्यांचे विहंगम दृश्य पाहायला मिळेल. या हिल स्टेशनचे वैशिष्ट्य म्हणजे ते उटी आणि कुन्नूर सारख्या प्रसिद्ध हिल स्टेशनपासून थोडे दूर आहे. त्यामुळे येथे तुलनेने कमी गर्दी असते आणि तुम्हाला अतिशय शांत, प्रदूषणमुक्त वातावरणात निसर्गाचे खरे सौंदर्य पाहायला मिळते. जुलैमध्ये पावसाच्या हलक्या सरी डोंगरांवर पडतात तेव्हा कोटागिरीच्या दऱ्या अधिक हिरव्या आणि फ्रेश दिसतात. या ऋतूत येथील चहाचे मळे, उंच देवदाराची झाडे, धुक्यानी वेढलेले पर्वत आणि विस्तीर्ण जंगले हे अधिकच जादुई दिसतात. पावसाळ्यात येथील धबधबे पूर्ण क्षमतेने वाहतात आणि हे सौंदर्य पाहून मन मंत्रमुग्ध होते.

या हिल स्टेशनवरील कॅथरीन फॉल्स हा धबधबा अडीचशे फूट उंचीवरून पडतो आणि आजूबाजूचे दृश्य इतके अद्भुत आहे की तुम्ही लगेच तुमच्या कॅमेऱ्यात कैद केल्याशिवाय राहणार नाही. हा धबधबा एक शांत वातावरणात वसलेला आहे आणि ट्रेकिंग प्रेमींसाठी एक उत्तम ठिकाण आहे. कोटागिरीमध्ये अनेक सुंदर ट्रेल्स आहेत जिथे तुम्ही ट्रेकिंग किंवा लांब चालण्याचा आनंद घेऊ शकता. विशेषत: कोटागिरी ते रंगास्वामी शिखरापर्यंतचा ट्रेक ॲडव्हेंचरने भरलेला आहे. येथून तुम्ही सूर्यास्त आणि सूर्योदय पाहू शकता.


निलगिरी टेकड्यांवर असलेल्या चहाच्या बागांना भेट दिल्याने एक वेगळीच शांतता मिळते. तुम्ही येथील ताज्या चहाचा आस्वाद घेऊ शकता आणि चहा उत्पादनाची प्रक्रिया जवळून पाहू शकता.

**येथे पोहोचायचे कसे?**

येथे ट्रेनने जायचे असेल तर सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन मेट्टुपलयम आहे. ते कोटागिरीपासून सुमारे ३३ किलोमीटर अंतरावर आहे. येथून कोटागिरीला टॅक्सी किंवा लोकल बसने जाता येते. सर्वात जवळचे विमानतळ कोइम्बतूर आहे.

# फॅशनच्या युगात भरतकामाचे रंग

फॅशन पॅशन



फॅशन च्या युगात डिझाइन आणि पॅटर्नमध्ये दररोज नवे प्रयोग केले जात आहेत. विशेषतः भरतकामात आजकाल बरेच काम केले जात आहे. भरतकामाचा समावेश सदाबहार डिझाइनमध्ये केला जात असला तरी, फॅशन आणि तंत्रज्ञानाच्या ट्रेंडमध्येही डिझायनर्स काम करत आहेत. याअंतर्गत आता शहरात उपलब्ध असलेल्या कपड्यांमध्येही देश आणि वेगवेगळ्या राज्याचे भरतकाम दिसून येते. भरतकामाच्या कलेला शक्य तितके प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी ३० जुलै रोजी जागतिक भरतकाम दिन साजरा केला जातो. भरतकामावर आधारित डिझाइन्स फॅशन ट्रेंड वाढवत आहेत. विद्यार्थी नावीन्यपूर्ण गोष्टी करत आहेत. शहरात कार्यरत असलेल्या महाविद्यालयांच्या फॅशन टेक्नॉलॉजी आणि टेक्सटाइल विभागांमध्ये मुले नावीन्यपूर्ण आणि प्रायोगिक डिझाइन्स आणि ड्रेसेसवर काम करत आहेत. ट्रेंडसोबतच आता रेशमी आणि सुती धाग्यांसह स्टोन, कुंदन, मोती आणि तारेदेखील वापरले जात आहेत. यासोबतच बाटिक, वाघ आणि आदिवासी प्रिंट फॅब्रिक्समध्येही भरतकाम केले जात आहे.

शहरातील मुलींमध्ये, कुर्ती आणि सूटमध्ये भरतकामाचा पॅटर्न सर्वाधिक पसंत केला जात आहे. शॉर्ट कुर्तीमध्येही पुन्हा एकदा भरतकामाचा पॅटर्न लोकप्रिय होत आहे. 'एव्हरग्रीन पॅटर्न'मध्ये भरतकामाचा समावेश आहे. परंतु थंड आणि आरामदायी लूकसाठी, आजकाल शॉर्ट कुर्तीमध्ये ते खूप पसंत केले जात आहे. शहरात वेगवेगळ्या शैलींमध्ये भरतकाम केलेले कपडे उपलब्ध आहेत. यामध्ये कर्नाटकच्या कुसुट्टी आणि काश्मिरी डिझाइनची एक विशेष श्रेणी समाविष्ट आहे. फॅशन डिझायनर्सच्या मते भरतकाम फार महाग नाही. त्यामुळे त्यात बरेच नावीन्यपूर्ण काम करता येते.

# नगर अर्बन को-ऑप.बँक आर्थिक घोटाळ्याप्रकरणी पोलिसांनी तपास गतिमान करावा : राजेंद्र चोपडा

नगर – अवसायानात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टिस्टेट बँकेच्या ठेवीदारांची प्रतिक्षा अखेर संपली असून प्रशासक गणेश गायकवड यांनी यापूर्वी घोषित केल्याप्रमाणे पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के रक्कम थेट ठेवीदारांच्या खात्यात वर्ग होण्यास सुरुवात झाली आहे. बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी डीआयसीजीसी व रिझर्व्ह बँकेकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळताच ठेवी परत देण्याची कार्यवाही सुरु केली आहे. यासाठी बँक बचाव कृती समितीने रिझर्व्ह बँक तसेच केंद्रीय निंबधक कार्यालयाकडे पाठपुरावा केला होता. आता बँकेतील आर्थिक घोटाळ्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या आरोपींवरही तपास करून कायदेशीर कारवाई पोलिसांनी गतिमान करावी, अशी मागणी बँकेचे सभासद राजेंद्र चोपडा व बँक बचाव समितीने केली आहे.

राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे की, नगर अर्बन बँकेच्या १९४० ठेवीदार व खातेदारांना पाच लाखांपुढील ठेवीपैकी निम्मी रक्कम मिळण्यास सुरुवात झाली ही आनंदाची बाब आहे. आता बँकेतील आर्थिक घोटाळ्याचा तपासही वेगाने होणे अपेक्षित आहे. पोलिसांनीच केलेल्या फॉरेन्सिक ऑडिटनुसार १०५ आरोपी निष्पन्न झाले आहेत. यात तत्कालिन काही संचालक, काही वरिष्ठ अधिकारी तसेच कर्जदारांचा समावेश आहे. बड्या थकबाकीदारांकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच सखोल तपास करून दोषींवरही कायदेशीर कारवाई झाल्यास बँकेच्या हितचिंतकांमध्ये चांगला संदेश जाण्यास मदत होणार आहे.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधीक्षक प्रश्रांत खैरे, पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, पोलिस उपअधीक्षक उगले व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांनी वेगाने तपास केला पाहिजे. आजही अनेक आरोपी मोकाट समाजात वावरत आहेत. आपल्याला धक्का लागू शकत नाही असा त्यांचा अविर्भाव असतो. अशा लोकांना कायदा काय असतो हे पोलिसांनी दाखवून द्यावे.

गोरगरीबांचा तळतळात घेतल्यामुळे व कर्ज वितरण करताना केलेल्या फसवणुकीमुळे या चुका झालेल्या आहेत. हा फार मोठा आर्थिक गुन्हा आहे. बँकेचे अवसायक गणेश गायकवाड व त्यांचे आज बँकेत असलेले काही अधिकारी, कर्मचारी हे सुध्दा थकबाकी वसुलीसाठी जोमाने प्रयत्न करीत आहेत. त्यांचेही बँक बचाव समिती अभिनंदन करीत आहे. परंतु याचवेळी नवीन रूजु झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांनाही विनंती आहे की, त्यांनी बँकेने कर्जदारांच्या ज्या काही तारण दिलेल्या मालमत्ता आहेत, त्या जप्ती करण्यासाठी लागणाऱ्या प्रशासकीय ऑर्डर देण्यासाठी खालील संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत. बँकेच्या कर्मचाऱ्यांना काही तलाठी, सर्कल या विषयात सहकार्य करीत नाहीत. महसूल खात्याच्या सर्व अधिकाऱ्यांना आपण याबाबत सूचना द्याव्यात अशी मागणी राजेंद्र चोपडा, बँक बचाव कृती समितीने केली आहे.

बँकेत कृष्णकृत्य करणारांविरोधात वेळोवेळी आवाज उठविण्याचे व सर्वसामान्य ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. मात्र आमच्यावरही खोटे आरोप करण्यात आले. मात्र आम्ही या आरोपांना भीक न घालता व्यापक जनहिताचे काम चालूच ठेवणार आहोत. आर्थिक घोटाळ्याच्या या विषयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही लक्ष घालून सहकार्य करावे, अशी मागणी राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

# योग्य थीम ओळखा, थिमॅटिक फंडाचा लाभ घ्या

सर्वसाधारण गुंतवणूकदाराचा बहुतांशी वेळ आणि ऊर्जा इक्विटी मार्केटमधील प्रचलित थीम ओळखण्यातच खर्च होतात. एकदा थीम एखादी ओळखली की, तिचा लाभ कसा घ्यायचा याचा शोध घेणे ही पुढची पायरी असते. त्यानंतर कळीचा प्रश्न येतो – गुंतवणुकीची ही योग्य वेळ आहे की गुंतवणूकदार खूप उशीरा – जेव्हा मूल्यांकन आधीच सर्वोच्च पातळीवर असते अशा चक्राच्या शिखरबिंदूच्या वेळेस – प्रवेश करत आहे?



दिपक लक्ष्मण शिंदे

बाजारापेक्षा सरस कामगिरी करण्यासाठी 'नॅरेटिव्ह स्टॉक्स' चा पोर्टफोलिओ तयार करण्याची प्रक्रिया गुंतागुंतीची आणि अनेकदा थकवणारी असते, त्यामुळे थिमॅटिक फंडांच्या माध्यमातून गुंतवणूक करणे हा एक हमखास पर्याय असतो. व्यावसायिक मालमत्ता व्यवस्थापन कंपन्यांद्वारे व्यवस्थापन केलेले हे फंड सुव्यवस्थित पद्धतीने उदयोन्मुख बाजारपेठेचा लाभ घेतात. सुव्यवस्थित कार्यपद्धतीचा वापर करून ते अनुकूल जोखीम-लाभ संतुलन कायम राखतात आणि अल्फा तयार करण्याचे त्यांचे उद्दीष्ट असते. सेक्टोरल / थिमॅटिक फंड इक्विटी म्युच्युअल फंडांमधील सर्वात मोठ्या श्रेणीचे प्रतिनिधित्व करतात, यात काही नवल नाही. त्यांच्या व्यवस्थापनाखाली एकूण ४.७ लाख कोटी रुपयांची मालमत्ता असून एएमएफआयच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२५ अखेर एकूण इक्विटी एयूएममध्ये त्यांचा वाटा अंदाजे १५.८३ टक्के आहे.

क्षेत्र आणि व्यापक अर्थव्यवस्था यांच्यातील सहसंबंधांबद्दल वेळेवर आणि सखोल ज्ञान न मिळणे, हे वैयक्तिक गुंतवणुकदारांसमोरील सर्वात मोठे आव्हान असते. वेळेची मर्यादा आणि संशोधनाच्या मर्यादित संसाधनांमुळे, बाजारपेठेच्या चक्रांमध्ये पूर्ण माहिती घेऊन बाजी लावणे कठीण असते. बाजारपेठेच्या चक्राच्या टप्प्यानुसार क्षेत्र आणि संकल्पनाधारित कामगिरी मोठ्या प्रमाणात बदलू शकते. यात यशस्वी कंपन्या बदलत असल्यामुळे सातत्याने योग्य क्षेत्राची निवड करणे जवळजवळ अशक्य असते आणि चक्राच्या चुकीच्या बाजूला अडकण्याचा परिणाम केवळ परताव्यावरच नव्हे तर गुंतवलेल्या मुद्दलावरही लक्षणीय प्रमाणात होतो.

दुसऱ्या बाजूला, थिमॅटिक फंडांना समर्पित फंड व्यवस्थापकांच्या कौशल्याचा फायदा होतो. ते सुव्यवस्थित पद्धतीने मॅक्रोइकॉनॉमिक ट्रेंड्सचे मूल्यांकन करतात, उदयोन्मुख संकल्पना ओळखतात आणि त्यानुसार वितरण ठरवितात. याशिवाय, थिमॅटिक फंड ऑफ फंड्सना (एफओएफ) अनुकूल कर रचनेचाही लाभ मिळतो. २४ महिन्यांपेक्षा जास्त काळ धारण केलेल्या फंडांवर केवळ १२.५ टक्के दीर्घकालीन भांडवली नफा कर (लॉंग टर्म कॅपिटल गेन्स टॅक्स) आकारला जातो, त्यामुळे परतावा वाढतो.

अहिल्यानगर येथील म्युच्युअल फंड वितरक दीपक लक्ष्मण शिंदे म्हणाले की आयसीआयसीआय प्रुडेन्शियल थिमॅटिक ॲडव्हान्टेज फंड (एफओएफ) हा असाच एक फंड आहे ज्यामध्ये गुंतवणूकदार गुंतवणुकीचा विचार करू शकतात. या फंड ऑफ फंड्स योजनेची रचना विविध क्षेत्रे आणि गुंतवणुकीच्या संकल्पनांमधील उदयोन्मुख संधींमध्ये गुंतवणूक करण्यासाठी करण्यात आली आहे. या फंडाने ३० मे २०२५ पर्यंत २०.८५ टक्के चा एका वर्षाचा दमदार परतावा दिला असून तीन वर्षांत २१.३८ टक्के सीएजीआर आणि पाच वर्षांत प्रभावशाली असा २८.७४ टक्के सीएजीआर परतावा दिला आहे.



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागाच्या २० विद्यार्थ्यांचे प्लेसमेंटद्वारे मल्टिनॅशनल कंपनीमध्ये नोकरीसाठी निवड झालेले विद्यार्थी, कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक वृंद. (छाया- विजय मते)

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी इलेक्ट्रिकल विभागातील कॅम्पस प्लेसमेंटद्वारे २० विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग विभागाने ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून कॅम्पस मुलाखतींमध्ये एकूण २० विद्यार्थ्यांची मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. चतुर्थ वर्ष इलेक्ट्रीकल इंजिनीअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण २८ कंपन्यांच्या वतीने प्लेसमेंट मुलाखती घेण्यात आल्या. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी, त्यानंतर तांत्रिक मूल्यांकन व प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. अखेरीस उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

यामध्ये कु.भुसा प्रचेता हिची निवड नगर येथील इपिटॉम कंपोनन्टस् प्रा.लि., गोरे मनिष याची फ्लेअर्स सोलर पी.व्ही. सिस्टम्स, तर गणेश आवटे याची लॉरीझ क्नुडसन या कंपन्यांमध्ये झाली.

या प्रक्रियेत सहभागी झालेल्या काही प्रमुख कंपन्यांमध्ये जॉन्सन कंट्रोल्स, फोरेशिया इंडिया प्रा. लि., जारो एज्युकेशन, कॉरीझो, कॉग्नीझंट, कॅपजेमिनी, टीसीएस, हायकुल इलेक्ट्रॉनिक्स, व्हेल्ट्रीक इलेक्ट्रीक व्हेईकल्स, फॉक्स सोल्युशन्स, सुदरलॅण्ड ग्लोबल सर्व्हिसेस, सी.जी. पॉवर, हेक्झावेअर टेक्नॉलॉजीज, कोकबन ऑटोमेशन यांचा समावेश होता.

# ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा ही अनेक स्पर्धा परीक्षांचा पाया

## अध्यक्ष रामचंद्र दरे यांचे प्रतिपादन; स्पर्धेत ५७०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

नगर – आजची पिढी ही अत्यंत बुद्धिमान, जिज्ञासू आणि स्पर्धाशील आहे. मात्र या गुणवत्तेला योग्य दिशा आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे. यासाठी शालेय जीवनातच विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची बीजे पेरली गेली पाहिजेत. 'ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा' हा त्याच उद्देशाने सुरू केलेला उपक्रम आहे. गेल्या २० वर्षांत ही परीक्षा केवळ एक स्पर्धा राहिलेली नसून ती हजारो विद्यार्थ्यांच्या यशाची पायरी ठरली आहे. आज आपले विद्यार्थी विविध प्रशासनिक सेवांमध्ये – आयएएस, आयपीएस, एमपीएससी, बँकिंग, सैनिकी सेवा यामध्ये कार्यरत आहेत, तेव्हा त्यामागे प्राथमिक टप्प्यावर घेतलेल्या अशा परीक्षांचे मोल असते. विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना स्पर्धेचे भान देणे, आणि त्यांना मोठे स्वप्न पाहण्याची प्रेरणा देणे हेच संस्थेचे कार्य आहे, असे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.



जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या रेसिडेन्शियल हायस्कूल, अहिल्यानगर येथे आयोजित ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभामध्ये शिक्षक व संचालकांसमवेत संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे आदी.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या रेसिडेन्शियल हायस्कूल, अहिल्यानगर येथे आयोजित ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. संस्थेने गेल्या २० वर्षांपासून इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा' सुरु केली असून या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेचे मूलभूत वळण शालेय वयातच तयार करण्याचा प्रयत्न केला जातो. आज अनेक माजी विद्यार्थी 'आयएएस', 'आयपीएस' आणि विविध शासकीय सेवांमध्ये कार्यरत आहेत, असे दरे यांनी अभिमानाने नमूद केले.

या परीक्षेत यंदा ५७०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये इयत्ता सहावी आणि सातवीच्या १०३ गुणवंत विद्यार्थ्यांनारोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जावळे सर यांनी केले, तर यशस्वी आयोजनाची धुरा एन. एस. भुसाळ यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे अनुमोदन संस्था निरीक्षक राजळे सर यांनी केले. प्राचार्य विजयकुमार पोकळे यांनी आभारप्रदर्शन केले.

कार्यक्रमास जयंत वाघ, जी. डी. खानदेशे, ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, तसेच विविध शाळा शाखांतील मुख्याध्यापक, शिक्षक, पालक वर्ग उपस्थित होते.

# शेख शिफा सी.ए. परीक्षा उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट ऑफ इंडियातर्फे मे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल (सी.ए) अंतिम परीक्षेत कापूरवाडी येथील शिफा अब्दुल अलीम शेख उत्तीर्ण झाली. तिला सी.ए पवनकुमार दरक सर (एफ. सी. ए. ॲकॅडमी) यांचे मार्गदर्शन लाभले. अजय गांधी ॲण्ड असोसिएट व सी.ए महेश तिवारी येथे आर्टिकलशिप पूर्ण केली. शिफा ला आई-वडील व बहिणीचे प्रोत्साहन मिळाले.



# मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा १७ जुलै रोजी मनपा आयुक्तांच्या दालनात कुत्रे सोडणार

नगर – मोकाट व पिसाळलेले कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने अनेक वेळा तोंडी व लेखी तक्रारी केल्या असून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याने मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नागरिक उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, मुकुंदनगर, फकीरवाडा परिसरात विविध ठिकाणी मोकाट कुत्रे धुमाकूळ घालत असून सकाळच्या वेळी लहान मुले शाळेत जाताना त्यांच्यावर भुंकून हल्ला करतात. तसेच महिला व वृद्धांना सुद्धा या कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. मुकुंदनगर परिसरात विविध ठिकाणी नेहमीच कुत्रा चावण्याची घटना घडत आहे. मनपा प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन मोकाट व पिसाळलेले कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा १७ जुलैला महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या दालनात कुत्रे सोडू आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी निवेदनाद्वारे दिलेला आहे.



काँग्रेस पदाधिकाऱ्यांसमवेत भिंगार काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रिजवान शेख.

# भिंगार काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी रिजवान शेख

नगर – महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने भिंगार काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी रिजवान करीम शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांच्या आदेशावरून जिल्हा कमिटीचे अध्यक्ष जयंतराव वाघ, जिल्हा उपाध्यक्ष अभिजीत कांबळे यांच्या सहकार्याने तसेच ज्येष्ठ नेते साहेबराव चौधरी, भिंगार कमिटीचे चिटणीस शामराव वागस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली निवडीचे पत्र देण्यात आले. तसेच अनेक वर्षापासून शेख यांनी भिंगार शहरांमध्ये कमिटीचेच कार्य केलेले आहे.

# इनरव्हिल क्लब श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी शितल भुतडा तर सेक्रेटरीपदी नम्रता मुंदडा





श्रीरामपूर – येथील इनरव्हिल क्लब ऑफ़ श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी आर्किटेक्ट सौ. शितल चेतन भुतडा तर सेक्रेटरी पदी इंजीनियर सौ. नम्रता संकेत मुंदडा यांची एकमतांनी निवड झाली आहे.

इनरव्हिल क्लबच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. ही बैठक मावळत्या अध्यक्षा डॉ. शितल अजित घोगरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपाध्यक्षपदी सौ. राखी बिहाणी, खजिनदारपदी सौ. सुरेखा दंड, आय.एस.ओ. पदी ममता गुप्ता, एडिटरपदी सौ. शितल कुंदे, सी.एल.सी.सी. पदी सौ. सुनिता धुमाळ, सी.पी.सी.सी. पदी सौ. श्वेता शाह, क्लब सी सी पदी सौ. रमा फोपळे यांची निवड करण्यात आली. यावेळी मावळत्या अध्यक्षा बरोबर, मावळत्या सेक्रेटरी डॉ. वंदना बोरा, चार्टर्ड प्रेसिडेंट श्रीमती मंगल आढाव या उपस्थित होत्या. नविन पदाधिकाऱ्यांची शपथविधी ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल अर्चना येथे होणार असल्याचे सांगितले. कार्यकारणी सदस्यमध्ये सौ. वृंदा देशपांडे, डॉ. सौ. ज्योतस्ना तांबे, सौ. प्रिया अग्रवाल, सौ. छाया झंवर, सौ. भारती काळे, डॉ. सौ. संगिता भिटे, सौ. नेहा बुब, सौ. सुवर्णा दळवी, सौ. स्नेहा बंग यांची निवड करण्यात आली.

# स्टेशन रोडवरून सुझुकी ॲक्सेसची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील स्टेशन रोड वरील फरहत टॉवर समोर हॅन्डेल लॉक करुन पार्क केलेली सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड (क्र. एम एच १६ बी एक्स ८५४१) अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना ७ जुलै रोजी दुपारी अडीच ते सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकिब आसिफ मिर्झा (वय २६, रा. घासगल्ली, कोठला) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास सफौ. बनकर करीत आहेत.



निवेश इंडिया कंपनीतर्फे गर्भगिरी डोंगरात वृक्षारोपण करण्यात आले.

# निवेश इंडिया कंपनीतर्फे गर्भगिरी डोंगरात वृक्षारोपण

नगर – निवेश इंडिया या कंपनीतर्फे आषाढी एकादशी निमित्ताने चांदबीबी महालाजवळील गर्भगिरी डोंगरात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षाचे नियमितपणे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला.

एक पाऊल हरित भविष्यासाठी याचा विचार करीत हा उपक्रम राबविण्यात आला. गर्भगिरी डोंगराच्या परिसरातील महादेव मंदिराच्या आवारात १५ पिंपळाची झाडे लावण्यात आली. ही झाडे ४ वर्ष जुनी असून शार्दूल निर्सरी (वारुळाचा मारुतीजवळ) च्या सहकार्याने लावण्यात आली. ही झाडे नियमितपणे जगवण्यासाठी निवेश कंपनीने विशेष व्यवस्था केल्याची माहिती कंपनीचे संचालक सचिन राणे यांनी दिली. या कार्यक्रमासाठी अभय सेल्सचे सुनील बनकर, सचिन कराळे, सागर थोरवे, राजेश पालवे, अक्षय गुंडेली, गणेश नलगे, निलेश जाधव, विलास जगदाळे, अमृत बनकर, अग्नित्र राणे, ज्ञानेश्वरी राणे, निधिता राणे आदी उपस्थित होते.



यावर्षी आषाढी एकादशी व मोहरम दोन्ही एकाच दिवशी आल्यामुळे मोहरम विसर्जन मार्गावर जुन्या कोर्टाच्या मागे नदीम भाई फ्रेंड सर्कल व एन ए कंपनीच्या युवकांच्यावतीने भक्तांसाठी खिचडी व सरबत वाटप पै. मनोज लोंढे यांच्या हस्ते करण्यात आले. मोहरमच्या सवारीला चादरदेखील अर्पण करण्यात आली.

# बुरुडगाव रोड भोसले आखाडा परिसरात डेंग्यूमुक्त जनजागृती मोहीम

नगर – आपले नगर शहर साथरोग मुक्त व्हावे याकरिता महानगरपालिकेचा आरोग्य विभाग सतर्क आहे. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने ११ ऑक्टोबर पर्यंत डेंग्यू मुक्त अहिल्यानगर शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुरुडगाव रोडवरील भोसले आखाडा परिसरामध्ये विषाणूजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त तसा प्रशासक यशवंत डांगे यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



बुरुडगाव रोड भोसले आखाडा परिसरात डेंग्यूमुक्त जनजागृती मोहीम राबविण्यात आली. (छाया – लहू दळवी)

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, डॉ. सतीश राजुरकर, प्रभाग अधिकारी एस. व्ही. तडवी, डॉ. दिलीप बागल, डॉ. राहूल झंवर, डॉ. आयेशा शेख, डॉ. सृष्टी बनसोडे, जयप्रकाश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

